ISSN (Print) : Applied...

पुणे.
जीवन शिक्षण
वर्ष : ६८, अंक : ५
ऑगस्ट, २०२३ (मासिक)
किंमत – रु. ३०/–
पृष्ठे ४४

# जीवन शिक्षण

Pune
Jeevan Shikshan
Vol. : 68, Issue : 5
August, 2023 (Monthly)
Price - ₹ 30/-
Pages 44

## वाचन सिद्धी विशेषांक - भाग ३




राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.








शिक्षण संचालनालय प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक योजना आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे आयोजित प्रशासन व अल्पसंख्याक संस्था, शाळा आणि विद्यार्थी यांच्यासाठी मार्गदर्शक पुस्तिका व राज्यातील जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थांमार्फत गुणवत्तावाढीसाठी निवडक विशेष उपक्रम पुस्तिका प्रकाशन समारंभ साजरा करण्यात आला.

त्याप्रसंगी मा. दीपक केसरकर, मंत्री, शालेय शिक्षण व मराठी भाषा विभाग, सूरज मांढरे, आयुक्त (शिक्षण), सर्व संचालक, अल्पसंख्याक संस्था, शाळांमधील अधिकारी, पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. ज्या अधिकाऱ्यांनी सदर पुस्तिका बनवण्यामध्ये मोलाचे योगदान दिले त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

# जीवन शिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

- मूल्य : रु. ३०/-
- वार्षिक वर्गणी रु. ३००/-
- प्रती : ५७,५००

वर्ष ६८ | ऑगस्ट, २०२३ | अंक ५ वा



- प्रवर्तक : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन
- प्रकाशन सल्लागार समिती :

**कौस्तुभ दिवेगावकर** (भा.प्र.से.), संचालक — **अध्यक्ष**

**रमाकांत काठमोरे**, सहसंचालक — **कार्यकारी संपादक**

**डॉ. नेहा बेलसरे**, प्राचार्य, आय.टी. व प्रसारमाध्यम आणि सामाजिक शास्त्र व कला-क्रीडा — **सहसंपादक**

**डॉ. कमलादेवी आवटे**, प्राचार्य, भाषा आणि समन्वय — **सदस्य**

**डॉ. शोभा खंदारे**, प्राचार्य, जि. शि. व प्र. सं., पुणे. — **सदस्य**

**ज्योती उपाशी**, सहा. संचालक, लेखा — **सदस्य**

**रत्नप्रभा भालेराव**, वरिष्ठ अधिव्याख्याता — **सदस्य**

**सचिन चव्हाण**, वरिष्ठ अधिव्याख्याता — **सदस्य**

- **निर्मिती सहायक :**

**डॉ. बालमणी नंदाला**,
अधिव्याख्याता (प्रसारमाध्यम आणि उर्दू विभाग)

- **संपादन मंडळ :**

माधव राजगुरू, नंदा कुलकर्णी,
श्रीकांत चौगुले, सलिल वाघमारे.

- **संपादक :**

**अरुण सांगोलकर**, वरिष्ठ अधिव्याख्याता तथा विभाग प्रमुख (प्रसारमाध्यम, इंग्रजी आणि उर्दू) — **सदस्य सचिव**


## वाचन सिद्धी विशेषांक - भाग ३

## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| संपादकीय | - | ४ |
| वाचनसमाधी | प्रा. मिलिंद जोशी | ५ |
| बालकांचे वाचन : समस्या आणि उपाय | डॉ. विनोद सिनकर | ८ |
| अवांतर वाचन, समृद्ध जीवन | रोहिणी चौधरी | ९ |
| वाचन शिक्षणाचा श्रीगणेशा | ना. गो. शुक्ल | ११ |
| जागर पुस्तकांचा, आनंद वाचनाचा | डॉ. प्रमोद कुमावत | १५ |
| वाचाल तर वाचाल | सायली महाजन | २४ |
| वाचनाच्या पाऊलवाटेने... | संदीप वाकचौरे | २६ |
| वाचनाची गोडी | आश्लेषा महाजन | ३२ |
| वाचनातून जिज्ञासू वृत्ती | दिलीप देशपांडे | ३६ |
| वाचनकौशल्य शिकूया | डॉ. दत्तात्रेय तापकीर | ३९ |
| इतिहासाच्या पानांवरून | श्रीकांत चौगुले | ४२ |



'जीवन शिक्षण' हे मासिक मालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक अरुण सांगोलकर यांनी रुना ग्राफिक्स, स. नं. ६४, त्रिमूर्ती हॉस्पिटलमागे, वडगांव (बु.), सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१ येथे छापून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, ७०८, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : अरुण सांगोलकर.

'Jeevan Shikshan' monthly publication is owned by Rajya Shaikshanik Sanshodhan Va Prashikshan Parishad, Maharashtra, Printed and Published by Arun Sangolkar, Printed at Runa Graphics, S. No. 64, Behind Trimurti Hospital, Vadgaon (Bk.), Sinhagad Road, Pune - 411 041 and Published at Rajya Shaikshanik Sanshodhan Va Prashikshan Parishad, Maharashtra, 708, Sadashiv Peth, Pune 411 030. Editor : Arun Sangolkar.

**दूरध्वनी :** ०२०-२४४८८३८२ **ई-मेल :** jeevanshikshan@maa.ac.in **वेब लिंक :** https://scertmaha.ac.in/jeevanshikshan/

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# संपादकीय ....

वाचक मित्रांनो,

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या वतीने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या अनुषंगाने दरमहा नवनवीन संकल्पनांवर आधारित जीवन शिक्षण मासिक प्रकाशित केले जाते. माहे जून आणि जुलै चे अंक हे वाचन सिद्धी विशेषांक भाग १ आणि भाग २ म्हणून प्रकाशित केले गेले.

मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व लक्षात घेऊन ऑगस्ट महिन्यासाठीसुद्धा याच संकल्पनेवर आधारित वाचन सिद्धी विशेषांक भाग ३ आपल्या हाती देताना मला खरोखरच आनंद होत आहे.

खरे पाहता, ज्ञान प्राप्तीसाठी सर्वांत महत्त्वाचे कौशल्य म्हणजे वाचन होय. वाचनाकडे केवळ कौशल्य म्हणून न पाहता, ज्ञान समृद्ध करण्याचा तो एक स्रोत आहे यादृष्टीने पाहिल्यास वाचनाचे महत्त्व अधिक विशद होते; म्हणजेच आपण जेव्हा जेव्हा वाचतो, तेव्हा तेव्हा नवीन काहीतरी शिकत असतो. हा नवीन शिकण्याचा मार्ग आपणास छंद किंवा आवड जोपासण्याकडे नेतो. वाचक ज्ञानी होतो. असे म्हटले जाते, की " The person who don't read has no advantage over the person who can't read". म्हणजे जी व्यक्ती वाचन करीत नाही ती वाचता न येणाऱ्या अशिक्षित माणसासारखीच आपल्या आयुष्यात येणाऱ्या वेगवेगळ्या संधी गमावत असते. आज जरी आपण इंटरनेटच्या युगामध्ये वावरत असलो, तरी ज्ञान मिळवण्यासाठी ग्रंथांना आणि वाचनाला अजून तरी पर्याय उपलब्ध झालेला नाही आणि तो होणारही नाही.

सर्वसामान्यपणे वाचन म्हणजे पुस्तके भरभर वाचून न काढता, वाचलेल्या भागाचे आकलन होणे किंवा वाचलेल्या भागाचा प्रत्यक्ष अर्थ समजणे होय. वाचनाला फक्त परीक्षा, अभ्यास यांपुरते मर्यादित न ठेवता एक सर्जनशील व्यक्ती म्हणून नावारूपास येण्यासाठी, तसेच प्रेरणादायी आयुष्य जगण्यासाठी प्रत्येकाने वाचनाची सवय लावून घेणे खूप महत्त्वाचे असते, म्हणून शिक्षक, पालक यांनी स्वतःबरोबरच आपल्या विद्यार्थ्यांमध्येही असे वाचनकौशल्य रुजवण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न केले पाहिजेत.

प्रा. मिलिंद जोशी यांच्या लेखातून एकाग्रता, वाचनसमाधीसाठी काय करावे याची मांडणी केली आहे. डॉ. विनोद सिनकर यांच्या लेखातून वाचनाची आवड व गती कशी वाढवावी, रोहिणी चौधरी यांच्या लेखातून अवांतर वाचनाने जीवन कसे समृद्ध होते हे प्रतीत होते. ना. गो. शुक्ल यांच्या लेखातून वाचनाच्या पद्धतीविषयी माहिती मिळते. वाचनाचा आनंद घेण्यासाठी विविध शिक्षकांनी राबविलेले उपक्रम डॉ. प्रमोद कुमावत यांनी आपल्यासमोर आणलेले आहेत. सायली महाजन आणि संदीप वाकचौरे यांच्या लेखातून 'वाचाल तर वाचाल' या उक्तीप्रमाणे वाचनातून व्यक्तिमत्त्व विकास कसा होत जातो याचे विवेचन केले आहे. आश्लेषा महाजन, दिलीप देशपांडे यांच्या लेखातून वाचनाची गोडी आणि जिज्ञासू वृत्ती कशी विकसित होते याचे विवेचन केले आहे. डॉ. दत्तात्रेय तापकीर यांनी वाचनप्रक्रिया कशी असते हे विशद केले आहे.

चला तर मग, स्वातंत्र्यदिनाच्या महोत्सवाची संधी घेऊन आपण सर्व जण वाचनयात्री होऊया!

आपणा सर्वांना स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**संपादक**
जीवन शिक्षण
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

# वाचनसमाधी

**प्रा. मिलिंद जोशी**
ए-१००४, सुवन क्रेस्टा,
महेश सोयायटी, बिबवेवाडी, पुणे.
भ्रमणध्वनी : ९८५०२७०८२३

*प्रा. मिलिंद जोशी हे महाराष्ट्रातील नामांकित वक्ते, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष आहेत. बालपणी वडिलांच्यामुळे त्यांच्यावर झालेल्या वाचनसंस्कारांचे महत्त्व त्यांनी सांगितले आहे. सध्याच्या काळात समाजमाध्यमे आणि प्रसारमाध्यमे यांमुळे वाचनावर विपरीत परिणाम झाला आहे. वाचनासाठी एकांत आणि एकाग्रता या दोन्हींची आवश्यकता असते, पण वाढत्या शहरीकरणात या दोन्ही बाबी हरवत चालल्या आहेत. एकूणच वाचनसंस्कृतीवर उत्तम भाष्य करणारा हा लेख चिंतनीय आहे.*

माझे बालपण खेड्यात गेले. मला साहित्याची गोडी लावण्याचे काम माझ्या वडिलांनी, आप्पांनी केले. माणकेश्वर या माझ्या गावात त्यावेळी ग्रंथालय नव्हते, तरीही घरात खूप पुस्तके असायची. मी सुट्टीत माणकेश्वरला गेल्यानंतर आप्पांच्या हातात कायम पुस्तक दिसायचे. अंगणातील तुळशी वृंदावनाजवळ एका आरामखुर्चीत बसून ते कायम वाचत असायचे. त्यांना पुस्तकातला एखादा भाग आवडला, तर आम्हा मुलांना हाका मारायचे. ते आरामखुर्चीत आणि आम्ही त्यांच्या सभोवती. त्यांना आवडलेला त्या पुस्तकातला भाग ते आम्हांला वाचून दाखवायचे. त्या पुस्तकाविषयी भरभरून बोलायचे. ते दुपारी जेवण करून झोपले, की मी त्या पुस्तकाचा फडशा पाडायचो. त्या खेड्यात इतर करमणुकीची कसलीही साधने नव्हती. घरातील रेडिओ सकाळपासून झोपेपर्यंत अखंड सुरू असायचा. अशा वेळी वाचनात मौज वाटायची. बैठकीतला एखादा कोपरा गाठायचा. हातात पुस्तक आणि सोबतीला भाजलेले शेंगदाणे किंवा चिवडा घेऊन पुस्तकाची पाने वाचत सुटायचो. लहान मुलांसाठीच्या गोष्टींच्या पुस्तकापासून वाचनाचा हा सुरू झालेला प्रवास, पाच-सातशे पानांचे पुस्तक दोन दिवसांत वाचून काढण्यापर्यंत झाला. अनेक चांगली व्याख्याने, कीर्तने, प्रवचने, गाण्यांचे कार्यक्रम ऐकताना श्रवणसमाधी अनेकदा अनुभवली होती. वाचनसमाधी काय असते, याचा अनुभव अशी पुस्तके वाचताना घेतला. कथा, कादंबरी, नाटक, कवितासंग्रह, चरित्र, आत्मचरित्र, वैचारिक लेखन असे सर्व साहित्य प्रकार मनमुराद वाचले. गूढकथा, रहस्यकथा, विनोदी कथा जास्त आवडीने वाचल्या.

मुलांच्या शिक्षणासाठी वडिलांनी बार्शीला घर केले होते. वडिलांबरोबर प्रथमच मी बार्शीच्या सार्वजनिक वाचनालयात गेलो. पुस्तकांच्या प्रेमात पडलो. नंतर या ज्ञानमंदिरात जातच राहिलो. येथे अनेक नामवंतांची व्याख्याने मी ऐकली. या वाचनालयातच वृत्तपत्रे किती येतात? अग्रलेख म्हणजे काय? स्तंभलेखन कशाला म्हणायचे? हे सारे समजले. कमीतकमी शब्दांत जास्तीतजास्त आशय कसा व्यक्त केला जातो, हे येथे येणारी वृत्तपत्रे वाचूनच समजले. दिवाळी अंकांची पर्वणी येथेच माझ्या वाट्याला आली. माझ्या वाचनवेडाला हे वाचनालयही कारणीभूत ठरले.

माझ्या मनातली वक्तृत्वाची ज्योत प्रज्वलित करण्याचे कामही माझ्या वडिलांनी केले. उत्तम वक्ता होण्यासाठी उत्तम वाचक होता आले पाहिजे, हे समजले. शब्दश्रीमंती वाढविण्यासाठी वाचनाला शरण जाणे आवश्यक आहे, हे उमगले. लहानपणी किंवा समज येईपर्यंतच्या काळात केलेले वाचन हे आवड म्हणूनच केलेले होते. त्या वाचनामागे कोणताही हेतू नव्हता. भाषणासाठी एखाद्या विषयाची तयारी करताना कराव्या लागणाऱ्या वाचनाची रीत वेगळी ठेवावी लागते. वाचून, थांबून, विचार करून पुढचे वाचावे लागते. जसे खाल्लेले पचविल्याशिवाय माणसाची प्रकृती सुदृढ होत नाही, तसे वाचलेलेही पचवावे लागते. काय वाचले, कोठे वाचले, कशात वाचले याच्या नोंदी ठेवण्याची सवय असेल, तर एखाद्या विषयावरील व्याख्यानाची तयारी करताना त्याचा खूप फायदा होतो. 'सर्वसारसंग्रह' या नावाची अनेक पृष्ठांची स्वातंत्र्यवीर सावरकरांची टिपणवही पाहिल्यानंतर आपण आश्चर्यचकित होतो. सावरकर म्हणत, 'माझ्या वक्तृत्वाचा पाया या टिपणवहीने मजबूत केला आहे.' वाचनातून मनाच्या गाभाऱ्यात काही शिरले, की त्याला नवे धुमारे फुटू शकतात; म्हणून गंभीरपणे वाचन केले पाहिजे, हे लक्षात आले. मग वाचनाकडे मी अधिक गंभीरपणे पाहू लागलो.

आज जीवनाचे शहरीकरण झाल्यामुळे जीवन प्रचंड गतिमान झाले आहे. वेळेचे गणित फारच काटेकोर झाले आहे. सभोवतालचा गोंगाट प्रचंड वाढला आहे. कार्यालयात टेबलावरचा फोन अखंड वाजत असतो आणि तितकेच फोन मोबाईलवरही येत असतात. सतत कोणाचा तरी संदेश आणि ई-मेल येत असतात. अशा धावपळीत अवांतर तर सोडाच; कामाचा भाग म्हणून करावे लागणारे वाचनही नीट करता येत नाही. घरातही वाचनासाठीचे स्वास्थ्य मिळेलच असे नाही. येणारे-जाणारे सतत घराची बेल दाबत असतात. घरातील सदस्यांचे फोनही सतत वाजत असतात. टीव्ही सुरूच असतो. घरातील आणि सोसायटीतील स्वयंपाकघरातून कुकरच्या शिट्ट्या ऐकायला येत असतात. पार्किंगमध्ये मुलांचा गोंगाट सुरू असतो. उत्सवाचे दिवस असतील, तर ध्वनिक्षेपकांचा धुमाकूळ सुरू असतो. या अशांत वातावरणात एकाग्र होऊन वाचन करता येणे फारच अवघड.

एकांत आणि एकाग्रता ही आपल्याकडे मूल्ये मानली आहेत. काळ सारावा चिंतने । एकांतवासी गंगास्नाने ।। असे तुकोबांनी म्हटले आहे. हा एकांत आज हरवला आहे, त्यामुळे वाचनातली एकाग्रताही कमी होत चालली आहे. त्यामुळे वाचनसमाधी वाट्याला येईलच याची खात्री देता येत नाही. वाचन ही गंभीरपणे करण्याची गोष्ट आहे, अशी माझी धारणा असल्यामुळे, त्यासाठी आवश्यक असलेला निवांतपणा आणि शांतता पहाटेच मिळू शकते, म्हणून मी पहाटे तीन-चार वाजता उठून वाचन करतो. त्यासाठी पहाटे लवकर उठावे लागते, पण लहानपणापासूनच इतक्या लवकर उठण्याची सवय असल्याने त्यात वेगळे काही वाटत नाही.

लहानपणी आपण सगळे पदार्थ आवडीने किंवा जबरदस्तीमुळे खात असतो. जशी समज येऊ लागते, तशी आपली म्हणून एक आवड विकसित होते. आपल्याला काय आवडते आणि काय पचते हेही आपल्याला समजू शकते. आपल्या लक्षात येते, की पेढा हा पदार्थ म्हणून चांगला आहे; पण आपली पचनशक्ती दुबळी असल्यामुळे आपल्याला तो पचणार नाही. मेथीची भाजी ही पालेभाजी म्हणून चांगली आहे; पण पित्ताचा त्रास असल्यामुळे ती उपयोगाची नाही. असेच वाचनाचेही आहे. काय आवडते आणि काय पचते हे खूप वाचल्यानंतरच लक्षात येते. खूप वाचले पाहिजे, ही त्यासाठीची पूर्वअट आहे. काहीच न वाचणाऱ्यांना

असे वर्गीकरण करण्याचा अजिबात अधिकार नाही. पुरती समज येईपर्यंत केवळ निखळ मनोरंजन करणारे खूप साहित्य वाचले. आता अस्वस्थ करणारे, अंतर्मुख करणारे, बुद्धीला ताण देणारे आणि विचारांची अनेक कंपने निर्माण करणारे साहित्य वाचायला जास्त आवडते.

माणसाच्या वाट्याला एकच आयुष्य आलेले आहे. या एकाच आयुष्यात अनेक जीवने जगल्याचा अनुभव केवळ आणि केवळ पुस्तकेच देऊ शकतात. लहानपणी शाळेतील बाई एक गोष्ट सांगत. फार फार वर्षांपूर्वी माणसाला पंख होते म्हणे! माणूस पक्ष्यांसारखा आकाशात उडू शकत होता, पण माणसाला गर्व झाला. परमेश्वराने त्याचे पंख काढून घेतले. माणसाला त्याची चूक समजली. त्याने क्षमायाचना केली. परमेश्वर त्याला म्हणाला, ''आता तुला पंख देणे शक्य नाही, पण पुस्तकांचे पंख लावून तू उंच भरारी घे!'' जगण्यासाठीचा संघर्ष कोणालाच चुकलेला नाही. निराशेच्या आणि संकटांच्या लाटा पदोपदी येतच असतात. त्यावर स्वार होऊन पुढे जाण्यासाठी बळ देण्याचे आणि प्रकाशवाटा दाखवण्याचे सामर्थ्य पुस्तकात आहे. शरीरासाठी आवश्यक असणारी जीवनसत्त्वे अन्नातून मिळतात; पण मन आणि बुद्धीच्या भरणपोषणासाठी गरजेची असलेली जीवनसत्त्वे केवळ पुस्तकांच्या वाचनातूनच मिळू शकतात.

तंत्रज्ञान हे माणसांचे जगणे सुखकर करण्यासाठी आहे आणि माणसे ही प्रेम करण्यासाठी आहेत. दुर्दैवाने आज आपण तंत्रज्ञानावर प्रेम करायला लागलो आहोत आणि माणसांचा वापर करायला लागलो आहोत. तंत्रज्ञानाच्या आहारी जाऊन आपल्याला केवळ यंत्रमानव घडवायचे नाहीत. हाडामासाची जिवंत माणसे घडवायची आहेत. ज्यांच्या डोळ्यांत अश्रू येतात, अशीच माणसे समाजाचे अश्रू पुसण्याचे काम करू शकतात. संवेदनशीलता बोथट होणे आणि अश्रू आटणे ही समाजाच्या ऱ्हासपर्वाची सुरुवात असते. ती थांबवायची असेल, तर वाचनसंस्कृती बळकट होणे जास्त गरजेचे आहे.

वाचनासाठी 'वेळच मिळत नाही' असे एक कारण नेहमी सांगितले जाते. ज्यांच्याकडे इच्छाशक्तीच नाही, त्यांच्यासाठी हे अतिशय समर्पक कारण आहे. वाचनानंद आणि त्यातून वाचनसमाधी अनुभवायची असेल, तर मनःपूर्वक वाचन करणे आणि वाचनावर प्रेम करणे याच गोष्टींची आवश्यकता आहे.

■■■


## वर्गणीदार होण्यासाठी

'जीवन शिक्षण' मासिकाची वार्षिक वर्गणी रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त) आहे.

**https://scertmaha.ac.in/ jeevanshikshan/**

**या लिंकवर जाऊन तसेच क्यूआर कोड स्कॅन करून सुद्धा तुम्ही वर्गणीदार होऊ शकता.**

**संपर्क : jeevanshikshan@maa.ac.in**

# बालकांचे वाचन : समस्या आणि उपाय

**डॉ. विनोद सिनकर**
औरंगाबाद.
भ्रमणध्वनी : ७५८८७३६३२६

*गतिशील आणि समजपूर्वक वाचन करता येणे हे अतिशय आवश्यक आहे; पण कोरोनाचा कालखंड आणि त्यानंतरची परिस्थिती यांमुळे मुलांचा वाचनवेग कमी झाला आहे. मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, वाचनाची गती वाढविणे, यांसाठी शालेय स्तरावर कोणकोणते उपक्रम आयोजित करता येतील याविषयी मार्गदर्शन करणारा उत्तम लेख.*

प्रथम फाउंडेशनने २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात केलेल्या असर सर्वेक्षण अहवालानुसार इयत्ता पाचवी ते आठवीच्या ६५ टक्के विद्यार्थ्यांची वाचनक्षमता कमी झाली आहे. २०१८ च्या निष्कर्षांच्या तुलनेत २०२२ मध्ये दहा टक्क्यांनी क्षमता विकास घटला आहे. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या मूलभूत वाचन क्षमतेतही मोठी घट झाली आहे. या सर्वेक्षणानुसार इयत्ता आठवीपर्यंतच्या सर्वच वर्गातील विद्यार्थ्यांच्या वाचनक्षमतेची टक्केवारी घसरली आहे. विद्यार्थी वाचनात कच्चे आहेत, याचा परिणाम साहजिकच भाषण-संभाषण आणि लेखन क्षमतेवर होतो.

कोरोना काळात शालेय विद्यार्थ्यांची बरीच शैक्षणिक क्षती झाली. या काळात विद्यार्थी शाळेपासून दुरावल्याचे गंभीर परिणाम आता दिसू लागले आहेत. लॉकडाऊननंतर पहिलीतील मुले थेट तिसरीत पोहोचली. दुसरी-तिसरीपर्यंत वाचन शिकलेली मुले दोन वर्षांच्या शैक्षणिक खंडामुळे मोबाईलच्या अधिक जवळ येऊन वाचन सराव, प्रकटवाचन यांपासून दुरावली. पाचवी-सहावीत बऱ्यापैकी वाचन शिकलेली मुले, वाचन सरावाअभावी अस्खलित वाचन विसरली. वाचनाची गोडी निर्माण होऊ लागलेली मुले अवांतर वाचनापासून दुरावली. एकूणच मुले वाचनाचा कंटाळा करू लागली आहेत. हे जरी खरे असले, तरी आता या बालकांच्या वाचनाकडे पालक, शिक्षक सर्वांनीच विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. वाचनगती मंदावलेल्या विद्यार्थ्यांची वाचनातील गती वाढवणे, अस्खलित प्रकटवाचन करणे, आरोह-अवरोहयुक्त वाचन आणि नियमित सराव यांद्वारे ही क्षती भरून काढता येणे शक्य आहे. विद्यार्थ्यांसमोर नवनवीन उत्तमोत्तम उताऱ्यांचे प्रकटवाचन करणे, भिन्न प्रकारचे वाचनतक्ते आणून त्यांचे वाचन घेणे, टेपरेकॉर्डरच्या/मोबाईल रेकॉर्डिंगच्या माध्यमातून वाचन स्पर्धा घेणे, उत्कृष्ट प्रकारे वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे, आणि इतरांनाही सरावाद्वारे त्यांच्यात अपेक्षित बदल घडवून आणण्यासाठी उपक्रम राबवणे, यादृष्टीने शिक्षकांनी प्रयत्न केल्यास वाचन विकास घडवता येईल. वाढदिवसाच्या निमित्ताने शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी बालवाचनालयास पुस्तके भेट देणे, शिक्षक-विद्यार्थ्यांनी भेट दिलेल्या पुस्तकांच्या वाचनासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, वाचलेल्या पुस्तकात काय आहे, असे सहजपणे विचारून त्याबद्दल त्यांना बोलायला प्रवृत्त करणे आदी उपक्रमही घेता येतील. लॉकडाऊन काळात सर्वच विद्यार्थ्यांचा वाचनकौशल्य विकास खुंटला, असे म्हणणे चुकीचे ठरेल; कारण काही पालकांच्या प्रयत्नांतून काही बालकांना वाचनाची गोडी लागली, तर काही बालकांना मुळातच वाचनाची गोडी असल्याने त्यांची वाचनाची गोडी या

**(पृष्ठ क्र. १० वर)**

# अवांतर वाचन, समृद्ध जीवन

**रोहिणी चौधरी**
नू. म. वि. मराठी शाळा,
सोलापूर.
भ्रमणध्वनी : ९९६०१७६६१७

*पाठ्यपुस्तकांबरोबरच इतर पुस्तकांचे वाचन केल्याने व्यक्तिविकास होतो हे जय-विजय या दोन मुलांच्या उदाहरणावरून पटवून देताना, शालेय वयात मुलांवर वाचनसंस्कार करण्यासाठी, त्यांना वाचनाची गोडी लावण्यासाठी काय काय करता येईल याचे मार्गदर्शन करणारा लेख.*

एका गावात जय, विजय नावाची दोन मुले राहत होती. दोघेही सुशिक्षित व सुसंस्कृत घरातील होते. लहानपणापासून एका शाळेत, एका वर्गात शिकत होते. दोघे अभ्यासात हुशार. वर्गात दोघांचाही नेहमी अव्वल नंबर असे. दोघे अगदी जिवलग मित्र होते; पण जयची प्रगती सातवीनंतर खालावली. विजय मात्र आत्मविश्वासाने प्रत्येक उपक्रमात, प्रत्येक चर्चेत, सहभागी होत असे. अभ्यासातील प्रगती उत्तम असे व तो स्वतःचे मत ठामपणे मांडत असे. जय मागे पडण्याचे कारण होते की, त्याचे बाबा त्याला पाठ्यपुस्तकांचाच अभ्यास करायला लावत असत. तो अभ्यासाव्यतिरिक्त इतर पुस्तके वाचू लागला, की त्याला 'अभ्यासाचे पुस्तक वाच म्हणजे चार मार्क जास्त पडतील' असे म्हणत. विजयचे बाबा मात्र विजयला पाठ्यपुस्तकांबरोबर इतर पुस्तके वाचण्यास प्रवृत्त करत असत, त्यामुळे त्याची आकलन क्षमता वाढली होती. शब्दसंपत्ती मोठ्या प्रमाणावर झाली होती. आज आपल्याला जय सारखी खूप मुले दिसतात. सुरुवातीला अभ्यासात झेप घेतात; परंतु हळूहळू ती मागे पडू लागतात किंवा काही मुले हुशार असतात, पण जगात वावरताना आत्मविश्वासाने ते आपले जीवन जगू शकत नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'वाचाल तर वाचाल.' याचा अर्थ असा आहे, की पाठ्यपुस्तकांच्या अभ्यासाबरोबरच तुम्ही अवांतर अनेक पुस्तके वाचल्यामुळे तुमच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात तुमच्यात धीटपणा येतो. वाचनामुळे शब्दसंपत्ती वाढते. मेंदूला चालना मिळते, सामान्यज्ञान वाढते, नवनवीन गोष्टींची माहिती मिळते, आपल्या विचारांमध्ये भर पडते आणि म्हणूनच नवनिर्मिती करण्यासाठी वाचन करणे गरजेचे आहे.

सध्या मनोरंजनाची अनेक साधने उपलब्ध आहेत. मोबाईल, टीव्ही, कॉम्प्युटर व लॅपटॉप यांवर मुले आपले मनोरंजन करीत असतात; परंतु या मनोरंजनाचा भविष्यात काहीच उपयोग नाही. वाचनामुळे जे मनोरंजन होते किंवा जो बदल आपल्यात होतो, तो आयुष्यभर आपल्या विचारांबरोबर आपल्या आचरणात राहतो. पुस्तकाला खरे मित्र किंवा गुरू म्हणून संबोधले जाते. तुम्ही जेव्हा एकटे असता, तेव्हा पुस्तके तुम्हांला साथ देतात. अवांतर वाचनामुळे जगाच्या पाठीवरील कोणत्याही गोष्टीची माहिती आपल्याला चटकन मिळते. अवांतर वाचनामुळे एकाग्रता वाढते, मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी वाचन एक उत्तम औषध आहे, वाचनामुळे आत्मविश्वास वाढतो, लक्षात ठेवण्याची क्षमता वाढते. दि. १५ ऑक्टोबर हा डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो. सर्व मुलांनी अवांतर वाचन करणे गरजेचे आहे. अवांतर वाचनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने हा दिन साजरा केला जातो. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम शास्त्रज्ञ होते. दिवसातील वीस-वीस तास ते पुस्तके वाचत असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी आपल्या घरालाच

ग्रंथालय बनवले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर दिवसातील अठरा तास वाचनात घालवत. ते म्हणत 'माझ्याकडे दोन रुपये असतील, तर मी एक रुपयाची भाकरी व एक रुपयाचे पुस्तक खरेदी करतो. भाकरीमुळे माझे पोट भरते, तर पुस्तकांमुळे माझ्या मेंदूला चालना मिळते'. आपले मस्तक म्हणजेच आपला मेंदू याचा जर चांगला विकास व्हायचा असेल, तर पुस्तकांसारखा दुसरा पर्याय नाही. ज्याप्रमाणे एखाद्या स्त्रीचे सौंदर्य अलंकारांनी शोभून दिसते त्याप्रमाणे आपल्या मनाचे, विचारांचे सौंदर्य पुस्तक वाचनामुळे वाढते. विद्यार्थ्यांना वाचन प्रवृत्त करण्यासाठी लहानपणापासून त्यांच्यात वाचनाची गोडी निर्माण करणे गरजेचे आहे. वाचनाची आवड निर्माण झाली तर त्याचा फायदा त्यांना भविष्यात होणार आहे, या गोष्टीचा विचार करून शालेय जीवनातच अवांतर वाचनाची आवड निर्माण करण्याकरता शिक्षकांनी व पालकांनी मोठी जबाबदारी घ्यावी. पालकांनी लहानपणीच मुलांना पुस्तकांच्या सहवासात ठेवावे. चित्रांची पुस्तके दाखवावीत व स्वतः त्यांच्यासमोर वाचन करावे ; जेणेकरून मुलगा आई-बाबांचे अनुकरण करेल. शिक्षकांनी शाळेत आल्यापासून त्यांच्यासमोर फ्लॅशकार्डचा वापर करून चित्रांचा वापर करून, वाचनाची गोडी निर्माण करावी. आठवड्यातून एक तास अवांतर वाचनासाठी द्यावा व प्रत्येक मुलाला एक पुस्तक वाचण्यास द्यावे. वाचलेल्या पुस्तकांवर चर्चासत्रासाठी एक तास घ्यावा. वाढदिवसाला पुस्तके भेट द्यावीत; तसेच एखाद्याचा सत्कार करताना श्रीफळ व हार न देता पुस्तक देऊनच सत्कार करावा. बक्षीस म्हणून पुस्तके द्यावीत, जेणेकरून त्या निमित्ताने ते पुस्तके वाचतील. वर्गात पुस्तकपेढी तयार करावी, फिरते ग्रंथालय, तरंगते वाचनालय (म्हणजेच एखाद्या दोरीवर पुस्तके अडकवून ठेवणे व मुलांनी ती पुस्तके स्वतः हाताने घेऊन वाचून झाल्यानंतर परत त्या दोरीवर ठेवणे.) वाचू आनंदे, 'जाऊ गोष्टींच्या गावा' यांसारखे विविध उपक्रम घ्यावेत. या पद्धतीने विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची आवड निर्माण करावी.

*'अवांतर वाचनाशी मैत्री, उज्ज्वल भविष्याची खात्री'*

■■■

**(पृष्ठ क्र. ८ वरून)**

काळात वाढीस लागली. कोरोना काळात शंभरपेक्षा जास्त अवांतर पुस्तकेसुद्धा काही गुणी बालकांनी वाचली आणि काहींनी तर वाचलेल्या पुस्तकांबद्दल अभिप्रायसुद्धा लिहिले. काहींनी वाचलेल्या पुस्तकांच्या लेखकांशी फोनद्वारे, व्हॉट्सॲपवरून, पत्राद्वारे संवाद साधल्याचीही उदाहरणे सांगता येतील. अर्थातच काही विद्यार्थ्यांचा या काळात उत्तम वाचनविकास झाला. हे प्रमाण अत्यल्प असले, तरी अशा विद्यार्थ्यांच्या वाचनाबद्दल, वाचनातील प्रगतीबद्दल वर्गातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर माहिती देता येईल. या वाचणाऱ्या विद्यार्थ्यांशी आपल्या विद्यार्थ्यांसमोर संवादक म्हणून उत्तम चर्चा घडवून आणता येईल. प्रत्यक्ष शक्य नसल्यास छोटेखानी ऑनलाईन कार्यक्रम घेता येईल. वाचनाचे महत्त्व सांगणाऱ्या काव्यओळी, छोट्या काव्यरचना यांचे फलक भिंतीवर लावून, त्याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना वाचनसंस्काराचे महत्त्व पटवून देता येईल. तंत्रज्ञानाचा उपयोग करून विद्यार्थ्यांना छोट्या बोधकथा, उत्तमोत्तम उतारे यांचे सुश्राव्य ऑडिओ, ऑडिओ बुक्स ऐकवता येतील. वर्गात आरोह-अवरोहयुक्त वाचन संस्कारासाठी प्रकटवाचन, अनुवाचन घेणे, जोडाक्षरे, जोडशब्द फलकावर लिहून त्यांचे प्रकटवाचन घेणे, शब्दपट्ट्या, वाक्यपट्ट्यांआधारे वाचनखेळांची योजना करणे, यांमध्ये उत्साह, सातत्य आणि प्रगती दाखवणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देणे, असे बरेच काही करता येण्यासारखे आहे. शिक्षकांनी आपापल्या पातळीवर, आपल्या विद्यार्थ्यांसाठी आवश्यकतेनुसार आणि शक्य त्या उपक्रमांचे नियोजन करून राबविल्यास निश्चितपणे हे प्रयत्नसाध्य आहे. सद्यःस्थितीत वाचनक्षमतेमध्ये दिसणारी मोठी घट चिंताजनक आहे, हे जाणून पालकांनीही याबाबत जागरूकतेने प्रयत्न करणे, शिक्षकांच्या प्रयत्नांना सहकार्य करणे आवश्यक आहे. अशा विविधांगी उपायांनी, विद्यार्थ्यांच्या वाचनक्षमतेचा प्रयत्नपूर्वक विकास घडवून आणता येईल.

■■■

# वाचन शिक्षणाचा श्रीगणेशा

ना. गो. शुक्ल
पुणे.

*वाचनाच्या अनेक पद्धतीत शब्दपद्धती ही प्रभावी आहे. हे शिक्षणक्षेत्रात अधिकारी म्हणून कार्यरत असताना आलेल्या अनुभवावरून तसेच स्वतःच्या मुलीच्या बाबतीतील वाचनप्रयोगावरून शब्दपद्धती किती फायदेशीर आहे, याचे उदाहरणांसह स्पष्ट करणारा हा लेख पुनर्मुद्रित करण्यात आला आहे.*

गेल्या तीस–चाळीस वर्षांत अनेक ठिकाणच्या प्राथमिक शाळा पाहण्याचा योग आला. पुणे, नगर, रत्नागिरी, रायगड, चंद्रपूर या जिल्ह्यांतील; अगदी खेड्यापाड्यांतील, डोंगरदऱ्यांतील लहान–मोठ्या प्राथमिक शाळा पाहिल्या. या शाळा पाहताना एका गोष्टीची खंत सतत वाटत राहिली; ती म्हणजे, या शाळांतील इयत्ता पहिलीची मुले वाचनाच्या बाबतीत कमालीची मागास आढळली. ज्या इयत्तेत वाचनाचा श्रीगणेशा व्हायचा, वाचन शिक्षणाचे प्राथमिक धडे ज्या इयत्तेत गिरवायचे, तिथेच जर अनास्था राहिली, कमकुवतपणा राहिला, तर या मुलांची शैक्षणिक प्रगती कशी होणार? झपाट्याने बदलणाऱ्या आजच्या जगात हा विद्यार्थी भांबावून तर जाणार नाही ना?

विस्तार अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षण वर्गात कधीमधी व्याख्यानाला गेलो असता, त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारताना ते विस्तार अधिकारीही सांगतात, की अजूनही परिस्थिती पालटलेली नाही. इयत्ता पहिलीची मुले वाचनात कमालीची कच्ची असतात असा आमचाही अनुभव आहे.

या कच्चेपणावर काही उपाय करता येईल का, हे पाहावे लागेल आणि हे करण्याचे काम इयत्ता पहिलीच्या शिक्षकांनाच करावे लागणार आहे. योग्य पद्धतीचा अवलंब करून वाचन शिकविल्यास विद्यार्थ्यांची प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही; परंतु कोणत्या पद्धतीचा अवलंब करावयाचा याची जाण शिक्षकाला असली पाहिजे. विस्तार अधिकाऱ्यांनी भाषा शिक्षणासंबंधीचा सखोल अभ्यास केला पाहिजे. विद्यार्थ्यांना वाचन शिकवण्यासंबंधी सखोल चिंतन केले पाहिजे व त्यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले पाहिजे. दैनंदिन मार्गदर्शनाचे कार्य मुख्याध्यापकांनी मनापासून केले पाहिजे.

इयत्ता पहिलीसाठी प्रकाशित केलेले भाषा विषयाचे पुस्तकही अत्यंत सावधपणे तयार केले पाहिजे. भाषेचे प्रचलित पुस्तक व गेल्या पंचवीस–तीस वर्षांत वेळोवेळी प्रकाशित झालेली भाषेची पुस्तके यांच्या रचनेत बदल झालेला दिसून येईल. हे बदल का केले आहेत, ते बदल योग्य झालेले आहेत का, याची चिकित्सक जाण किती शिक्षकांना आहे?

इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांची प्रगती, त्यांचे शिक्षक वाचन शिकवण्याच्या ज्या पद्धतीचा अवलंब करतात त्यावर अवलंबून असते.

वाचन शिकवण्याच्या पद्धतींचा विचार करता स्थूलमानाने दोन पद्धतींचा विचार करता येईल. पहिली अक्षर पद्धती व दुसरी शब्द किंवा वाक्यपद्धती. या दोन्ही पद्धतींचे गुणदोष आपणाला माहीत असले पाहिजेत. विशेषतः इयत्ता पहिलीच्या शिक्षकाला या दोन्ही पद्धतींच्या परिणामांविषयी अनुभवाधारित मते

व्यक्त करता आली पाहिजेत. कोणत्या पद्धतीने वाचन शिकवणे व वाचन शिकणे सुकर होते याची समज शिक्षकाला असणे जरुरीचे आहे.

प्रथम अक्षरे शिकवणे व नंतर अक्षर समुच्चयामुळे तयार होणारे शब्द शिकवणे ही परंपरागत पद्धत होय; परंतु प्रथम शब्द शिकवणे व नंतर त्या शब्दातील अक्षरे शिकवणे ही जरा आगळी पद्धत आहे. वाचन लवकर येण्याच्या दृष्टीने शब्दपद्धतीने शिकवणे परिणामकारक ठरते असा अनुभव आहे.

केवळ अक्षरपद्धतीचा अवलंब केला, तर अर्थग्रहणास अडथळा येतो. वाचनात तुटकपणा येतो आणि वाचन शिकण्याच्या मुख्य हेतूलाच बाधा येते. अक्षर पद्धतीने शिकणारी मुले अक्षरांशीच झगडत राहतात. सर्व स्वर, व्यंजने, बाराखड्या, जोडाक्षरे या सर्वांचा पक्का परिचय करून घेता घेता शिकणाऱ्या बालकाची दमछाक होते. मुले अशा प्रकारे शिकण्याचा कंटाळा करतात व काही काही तर शाळेला आणि शिक्षणाला रामराम ठोकतात.

'अ' शिकल्यावर 'आ' का शिकायचा हे बालकाला समजत नाही. 'ब' शिकल्यावर 'बा' का शिकणे जरुरीचे आहे हे त्याला उमगत नाही. ही सर्वच मूळ अक्षरे कार्यहीन आहेत. वाचन शिकण्याच्या दृष्टीने ती कमकुवत आहेत, कारण अर्थज्ञान हा वाचन शिकण्याचा मुख्य हेतू आहे. तो साध्य होणार नसेल, तर अक्षर पद्धत जरा बाजूला ठेवून एखादा नवा मार्ग शोधला पाहिजे, असा विचार करून शब्दपद्धतीचा अवलंब का करू नये?

हवेली तालुक्यातील विस्तार सेवा विभागात शब्द-पद्धतीने शिकवून पाहण्याचा प्रयोग केला गेला होता. शिक्षणशास्त्र संस्थेतील विस्तार सेवा विभागात श्री. व. द. तांबे काम करत होते. त्यांच्या सहकार्याने शब्दमूल सार्थवाचन प्रकल्प हाती घेतला होता. पाठ्यपुस्तकांतील प्राथमिक पाठांतील सर्व शब्दांची क्षणचित्रे (Flash Cards) तयार करून ती विस्तार सेवा विभागातील सर्व शिक्षकांना पुरवण्यात आली होती. त्यांचा उपयोग केल्यामुळे मुलांच्या वाचनात विलक्षण फरक पडला होता. सुमारे दोन तपांपूर्वीची ही हकिगत आहे; परंतु शब्दपद्धतीने शिकवल्यास मुलांची वाचनाची प्रगती लक्षणीय होते हा अनुभव कोणालाही व केव्हाही घेता येण्यासारखा आहे.

शब्दपद्धतीने वाचनाचा श्रीगणेशा केल्यास, वाचन शिकणे व शिकवणे या दोन्हीही क्रिया आनंददायक होतात याचा मी अनुभव घेतला आहे. त्यामुळे मी स्वतः शब्दपद्धतीचा पक्का पुरस्कर्ता झालो आहे. काही अनुभव सांगण्याचा मोह झाल्यामुळे त्यांचे निवेदन करत आहे.

माझ्या मोठ्या मुलाची मुलगी कल्याणी. ती दोन-अडीच वर्षांची होती. तिच्यासाठी आई, बाबा, नाना, ताई, भाऊ अशा शब्द पट्ट्या तयार केल्या. तीन-चार, तीन-चार पट्ट्या वारंवार दाखवत गेलो. चिठ्ठ्यांवर काय लिहिले ते सांगत गेलो. अनुभव असा आला, की ती सहजतेने ते शब्द ओळखू लागली, वाचू लागली. तिला येणाऱ्या शब्दांत कोणत्या नव्या शब्दांची भर घालायची याचा विचार मनात होताच; लक्षात असे आले, की तिला काही वस्तू, काही माणसे फार आवडतात. त्या वस्तूंच्या, माणसांच्या शब्दपट्ट्या तयार करत गेलो व त्यांची ओळख करून देत गेलो. तूप, बिस्किट, टीव्ही, सुभद्राबाई, पेढा, कारंजे, बुडबुडा हे शब्द तिला सहज वाचायला येत होते. तिला सहज वाचता येईल अशी शब्दसंख्या सत्तर-पंच्याहत्तरपर्यंत गेली.

'सकाळ' वृत्तपत्राने 'अडीच वर्षांची मुलगी वाचायला लागली' अशा मथळ्याखाली बातमी दिली. कल्याणीचे कौतुक झाले. त्याचा मला आनंद झालाच; परंतु शब्दपद्धतीने मुले लवकर वाचायला शिकतील हा माझा होरा खरा ठरला याचा आनंद मला अधिक झाला.

हवेली तालुक्यातील वाघोलीच्या शाळेत

श्री. शेवाळे हे शिक्षक होते. मी एका गटसंमेलनासाठी वाघोलीस गेलो होतो. शेवाळे पतीपत्नींनी आपल्या अडीच–तीन वर्षांच्या मुलाला गटसंमेलनास आणले होते. छोट्या शेवाळेने विहीर, झाड, गोळी, गवत असे शब्द सर्व शिक्षकांसमोर वाचून दाखवले. श्री. शेवाळे यांचे निवासस्थान शेतात होते. त्याच्या परिसरातील शब्द छोट्या शेवाळेने लीलया वाचले. मी श्री. शेवाळे दांपत्याची व त्यांच्या मुलाची तोंडभरून स्तुती केली.

बारामती तालुक्यात काही काळ मी सहायक उपशिक्षणाधिकारी म्हणून काम करत होतो. शाळा तपासणीच्या नजीकच असलेल्या द्रवाण वस्तीचे शिक्षक भेटले. केवळ दोनच इयत्ता असलेली ही छोटेखानी शाळा. गुरुजींना म्हटले, तुमची शाळा तपासण्यासाठी एक दोन दिवसांत येईन. गुरुजी म्हणाले, 'साहेब, कसली आमची शाळा पाहताय! माझ्या शाळेतील दुसरीतील मुलांची तयारी पहिलीच्या दर्जाचीही नाही. आमची काही मुले अक्षरात अडकून पडलीत. काही मुले बाराखड्यांच्या भोवऱ्यात सापडलीत. दोन्हीही इयत्तांमधील मुले अक्षराअक्षरांवर अडखळतात. गुरुजींना धीर देण्यासाठी मी त्यांना सांगितले, 'मी तुमच्या शाळेत काय तपासणार आहे ते सांगतो. पहिल्या पुस्तकातील पहिल्या दहा पाठांतील सर्व शब्दांची कार्डे तयार करा. प्रत्येक शब्दासाठी एक कार्ड असावे, शब्द ठळक अक्षरांत असावेत. दोन्ही वर्गातील प्रत्येक मुलाला, प्रत्येक कार्डावरचा शब्द वाचायला येतो किंवा नाही, एवढेच तपासणीत मी पाहीन. किती दिवसांनी तपासणी घेऊ?' गुरुजी म्हणाले, ''तीन एक आठवडे लागतीलच.''

मी फक्त एवढेच सांगितले, की लवकर तयारी झाली, तर मला कळवा. मी येऊन जाईन. विशेष गोष्ट म्हणजे; गुरुजींचा आठ–दहा दिवसांतच निरोप आला, की सर्व मुलांची तयारी झाली आहे. शाळेची तपासणी झाली. मला आनंद झाला. गुरुजींच्या आनंदाला पारावर नव्हता. शब्दपद्धतीची किमया गुरुजींनी अनुभवली होती.

देशाने नवे शैक्षणिक धोरण जाहीर केले. महाराष्ट्राने कृतिकार्यक्रम आखला. परिषदेने विविध विषयांसाठी कृतिपत्रिका प्रकाशित केल्या. भाषा शिक्षणासाठी जी कृतिपत्रिका तयार केली आहे, त्यातील वाचन शिकवण्यासाठी जो भाग दिला आहे, तो जरूर वाचावा. त्यात विस्तारपूर्वक विवेचन केले आहे.

केवळ मातृभाषेचेच वाचन शिकवताना शब्दपट्ट्यांचा उपयोग होतो असे नाही, तर इंग्रजी माध्यमातून शिकणाऱ्या मुलांनाही त्यांचा उपयोग होतो. त्यासंबंधी एक आठवण सांगण्यासारखी आहे.

मी एकदा कोल्हापूरला गेलो होतो. शब्दाधारे वाचन शिकवण्यासंबंधीचे अनुभव तेथील शिक्षणाधिकारी यांना सांगावेत, म्हणून त्यांच्या घरी गेलो. डॉ. काळपांडे हे तेथे शिक्षणाधिकारी होते. उल्हसित होऊन मी माझे अनुभव सांगत होतो. माझे सांगणे त्यांनी तितक्याच उत्साहाने ऐकून घेतले. माझे बोलणे, सांगणे संपले. ते म्हणाले, ''तुम्ही मला खूप काही सांगितलेत. आता मी तुम्हाला माझ्या घरचाच अनुभव सांगतो, पण केवळ सांगण्यापेक्षा तुम्ही प्रत्यक्षच पाहा.''

त्यांनी आपल्या छोट्या मुलाला बोलावले. स्वारी हातात एक लहानसे खोके घेऊन आली. खोक्यात शब्दांची कार्डे होती. मुलाने एकेक कार्ड काढले. कार्डावरचा शब्द वाचून दाखविला. सर्वच शब्द इंग्रजी होते. मी चकित होऊन पाहू लागलो. डॉ. काळपांडे यांनी मला एकच बाब सांगितली; ती म्हणजे या मुलाला ए,बी,सी,डी ही मुळाक्षरे फारशी सरावाची झालेली नाहीत. त्याला अक्षरे नीट वाचता येत नाहीत.

शब्दांची महती सांगायला शब्द अपुरे पडतील. अर्थप्राधान्यता हा त्याचा मुख्य गुण आहे. शब्द लिहिला, की त्याला रूप येते. तो उच्चारला, की तो ध्वनिसमुच्चय रूप घेतो. शब्द चालायला लागले, की

त्याला आगळे परिमाण लाभते. नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, अव्यय इत्यादी रूपे घेऊन शब्दच भाषेला श्रीमंत करतात. कधीकधी ते पूर्ण मुके होतात आणि विचारात गढून जातात. एखादा शब्द वाक्यरूप धारण करतो. असे हे शब्दांचे विश्व आहे; म्हणूनच वाचनाची सुरुवात बाळबोध शब्दांनी करणे हे उत्तम.

लेखन शिकवतानाही शब्दांचा आधार घेणे चांगले. वड, बदक, कमळ या शब्दांतील आद्याक्षरे असणारी व, ब, क ही अक्षरे लिहायला शिकवण्यापेक्षा संपूर्ण शब्दच लिहायला शिकवणे परिणामकारक ठरेल. असे केले, की आपण जे लिहितो त्याचा अर्थ बालकाला प्रतीत झाल्याशिवाय राहणार नाही. शब्दलेखन करत असताना अक्षर लेखनाचे अध्ययन, अध्यापन होत राहत असते. लेखन ज्ञानाचा उपयोग वाचनप्रगतीसाठीही होत राहतो.

प्राथमिक शाळेत पहिलीतील विद्यार्थ्यांना शब्दांचा उपयोग करून शिकवायचे ठरवल्यानंतर, ते शब्द कोठून गोळा करायचे याचाही जाता जाता विचार करता येईल. आपापल्या शाळेत चालणाऱ्या उपक्रमांतून व शैक्षणिक परिसरातून शब्द वेचून घेता येतील. त्यासाठी पुढील बाबींचा विचार करावा :

(१) पाठ्यपुस्तक (२) मुलांनी तयार केलेले पाठ (३) गोष्टी (४) गाणी (५) संग्रह (६) चित्रे (७) भाषिक खेळ (स्वयंअध्ययन साहित्य)

**(१) पाठ्यपुस्तक :** यातील पाठ्यपुस्तकासंबंधी विचार करताना एवढाच विचार करावा, की पाठ्यपुस्तक हे सर्वस्व नव्हे. ते एक साधन आहे. साधन म्हणून त्याचा उपयोग केल्यास साध्य जवळ येते.

**(२) मुलांनी तयार केलेले पाठ :** मुलांच्या आवडीच्या व अनुभवांच्या आधारावर दोनचार वाक्यांचे छोटे पाठ मुलांच्या साहाय्याने वर्गात तयार करावेत. त्यांचे तक्ते तयार करून ते वर्गात लावावेत.

**(३) गोष्टी :** आपण वर्गात गोष्टी सांगतो. मुले ऐकतात. रंगून जातात. गोष्ट सांगून झाल्यावर मुलांनी गोष्टीतील पाच-सहा शब्द सांगावेत. तेच शब्द फळ्यावर लिहावेत. मुलांकडून वाचून घ्यावेत. मुले हे शब्द का वाचू शकतात याचा विचार करावा.

**(४) गाणी :** जे गोष्टींबाबत तेच गाण्यांबाबत. मुलांनी एखादे गाणे म्हटले, की त्यातील काही शब्द मुलांनी सांगावेत. ते फळ्यावर लिहावेत. मुलांकडून वाचून घ्यावेत.

**(५) संग्रह :** मुले ज्या वस्तूंचा संग्रह करतात, त्यांची नावे विचारून घ्यावीत. ती फळ्यावर लिहावीत. मुलांकडून वाचून घ्यावीत. एखादा सोपा शब्द मुलांना आपापल्या पाटीवर लिहायला सांगावा.

**(६) चित्रे :** पाठ्यपुस्तकातील, वर्तमानपत्रांतील किंवा मासिकांतील चित्रे मुलांनी बारकाईने पाहावीत. साधे गणपतीचे चित्र जरी मुलांनी पाहिले, तरी मुले सोंड, मोदक, मुकुट, उंदीर, धोतर असे काही शब्द सांगतील. ते शब्द फळ्यावर लिहावेत आणि मुलांकडून वाचून घ्यावेत.

चित्रांच्या अभ्यासाचा आणखी एक फायदा म्हणजे, मुलांना चित्रे रेखाटायला सांगता येतील. गणपतीचे चित्र पाहून चित्रातील पाट, कोनाडा, मखर, नक्षी इत्यादी चित्रे मुलांनी रेखाटावीत. चित्रे काढल्यामुळे लेखनाला सुगमता येते. अक्षरे म्हणजे उच्चाराची चित्रेच आहेत.

**(७) भाषिक खेळ (स्वयंअध्ययन साहित्य) :** शिक्षकांनी औपचारिकरीत्या न शिकवता, मुले आपणहून काही वाचन शिकतील का, याचा विचार करावा. पुण्याजवळच्या चऱ्होलीच्या शाळेत मी जात होतो. तेथील शिक्षकांनी काही तक्ते करून

**(पृष्ठ क्र. २३ वर)**

# जागर पुस्तकांचा, आनंद वाचनाचा

**डॉ. प्रमोद कुमावत**
अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
औरंगाबाद.

*“महाराष्ट्रातील अनेक शिक्षकांनी वाचनावर आधारित विविध प्रयोग केलेले आहेत. मात्र बदलत्या काळानुरूप आपण जेवढे करू तेवढे कमीच असते. ज्या शिक्षकांनी कल्पकतेने नवनवीन उपक्रम राबविले आणि मुलांमध्ये वाचनवेड निर्माण केले अशा शिक्षकांच्या प्रेरणादायी गोष्टी आणि उपक्रम यांचा ऊहापोह या लेखात करण्यात आला आहे.”*

संस्कृतमध्ये वाचन हा शब्द 'वच्' या धातूपासून तयार होतो. 'वच' म्हणजे वचन म्हणजेच बोलणे. ग्रंथ किंवा पुस्तके ही आपल्याशी बोलतच असतात. लहानपणी लागलेली वाचनाची गोडी आयुष्यभरासाठी एक शिदोरीच असते. अनेक साहित्यिक, लेखक यांचे असे अनुभव आहेत, की त्यांच्या बालवयात किशोर, चांदोबा, किलबिल, चंपक, अमृत, अकबर–बिरबल, इसापनीती, राजाभोज आणि वेताळ अशा विविध पुस्तकांनी त्यांच्या बालमनाला भुरळ घातली होती. आजी–आजोबांच्या गोष्टी ऐकत, पुस्तके वाचत लहानपण गेले व यातूनच वाचनाची गोडी लागली. बालपणात वाचनातून व ऐकण्यातून मूल समृद्ध होते. ते समृद्धपण त्याच्या बोलण्यातून कळते. वाचन ही माणसाला समृद्ध बनवणारी बाब आहे. वाचन जीवनाला एक दिशा देते, विचार करायला शिकवते, अंतर्मुख बनवते, योग्य काय, अयोग्य काय हे शिकवते. वाचनाने व्यक्तिमत्त्वाचा अंगभूत विकास होतो. वाचनाने ज्ञान आणि आनंद दोन्ही प्राप्त होतात. 'जग बदलणारे ग्रंथ' या पुस्तकाच्या मनोगतात लेखिका दीपा देशमुख यांनी पुस्तकांचे महत्त्व सुंदरपणे मांडले आहे. त्या म्हणतात, ''पुस्तकं काय देत नाहीत? आपल्याशी काय बोलत नाहीत? सगळं काही भरभरून देतात. पुस्तके वाचकांना समृद्ध बनवतात. पुस्तके माणसांना संयमाचे आणि जगण्याचे भान देतात. माणसाची श्रीमंती त्याच्याकडे असलेल्या, त्याने वाचलेल्या पुस्तकांवरून ठरते. पुस्तकांशी मैत्री कोणत्याही वयात होऊ शकते, पण लहान वयात लागलेली पुस्तकांची गोडी आयुष्यभर टिकते.''

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण– २०२० नुसार वय वर्षे ३ ते ९ या वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांना पायाभूत साक्षरता आवश्यक आहे.वाचन करता येणे हा मुलांच्या शिक्षणाचा प्रारंभ आहे. वाचन करता आले की, मूल स्वतःच्या गतीने वाचू व शिकू लागते. इयत्ता तिसरीच्या पुढे गेलेल्या व अपेक्षित क्षमता पूर्ण न केलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'निपुण भारत' अंतर्गत 'पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान' अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यासाठी उपक्रमशील शिक्षक आपल्या कल्पकतेने विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी म्हणून विविध प्रयोग करताना दिसतात. दि. २७ ऑक्टोबर, २०२१ रोजी शासनाने 'पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान' अभियानाच्या अंमलबजावणीसाठी एक 'शासन निर्णय' काढला आहे. त्यात पायाभूत साक्षरतेचे नऊ घटक दिलेले आहेत ते असे (१) मौखिक भाषा विकास (२) उच्चारशास्त्राची जाणीव (३) सांकेतिक भाषालिपी समजून घेणे. (४) शब्दसंग्रह (५) वाचन व आकलन (६) वाचनातील ओघवतेपणा (७) लेखन (८) आकलन (९) वाचन संस्कृती/वाचनाकडे कल.

खरे तर आपले प्राथमिक शाळेतील शिक्षक कल्पक व अडचणींवर मात करणारे असे आहेत. अनेक शिक्षकांनी चांगले उपक्रम राबवलेले आहेत. त्यातील काही कल्पक शिक्षकांचे प्रयोग आपण पाहू.

**(१) ग्रीन गार्डन रूम :**

*गोडी मना वाचनाची*
*आवड अंगी ज्ञानसाधनेची*
*साथ सोबत निसर्गमित्रांची*
*हिताची संगत अभ्यासाची*



या कवितेच्या आशयाला धरून जि. प प्राथ. शाळा दहिफळ बोंगाणे पूर्व, ता. परतूर, जि. जालना येथील उपक्रमशील शिक्षक पी. व्ही. मैसनवाड यांनी 'ग्रीन गार्डन रूम' हा उपक्रम राबिवला आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण झाली आहे. मुलांना अभ्यासाची गोडी लागावी, मुलांची वाचनगती वाढावी, तसेच निसर्गाच्या सान्निध्यात मुलांनी शिकावे, आनंद घ्यावा या उद्देशाने हा उपक्रम त्यांनी हाती घेतला आहे. कोविड काळात मुलांना मोबाईल वापरण्याची सवय लागली होती. त्यामुळे वाचन, लेखन करण्यासाठी त्यांना बराच वेळ एकाच ठिकाणी बैठक करणे शक्य होत नव्हते. वाचनाच्या प्रवाहात मुलांना आणण्यासाठी व गुणवत्तावाढीसाठी हा उपक्रम सुरू केला आहे. निसर्ग हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्याच्या निरीक्षणातून शिकत आपण पुढे जात असतो. शाळेचा परिसर खडकाळ असल्याने उन्हाचा खूप त्रास होत होता. त्यासाठी निसर्गाच्या सान्निध्यातील अभ्यासिका गरजेची होती. ग्रीन गार्डन रूम तयार करण्यासाठी ग्रीन नेट आणली, 'माझी वसुंधरा' अंतर्गत शाळेत झाडे होतीच. वाचनासाठी ८०० पुस्तके आणली व दिशादर्शक बॅनर तयार करण्यात आले.

शाळा सुरू होण्याअगोदर एक तास व दुपारच्या वेळी मुले ग्रीन गार्डन रूममधील तारेवरची पुस्तके घेऊन वाचन करतात. इतर मुलांना मदत करतात. मुलेच तारेवर पुस्तके लावतात. इतर शालेय अभ्यास पण मुले आपल्या सवडीनुसार या ठिकाणीच करतात. मोठ्या इयत्तेतील मुले लहान इयत्तेतील मुलांना शिकवतात. शाळेतील काही विद्यार्थी विषयमित्र म्हणून कार्य करतात. ते या सर्व उपक्रमावर नियंत्रण ठेवतात. तारेवरची पुस्तके सहज घेता येतात या उपक्रमामुळे वाचनाची गोडी वाढू लागली. शेजारच्या गावात सार्वजनिक वाचनालय आहे. शाळेतील सर्व मुले त्या वाचनालयाचे सदस्य आहेत. त्या वाचनालयातून मुले वेगवेगळी पुस्तके आणतात व वाचतात. विविध साहित्यिकांनी शाळेला भेट दिली आहे. मुलांनी त्यांच्या मुलाखती घेतल्या व त्यांचा जीवनप्रवास अनुभवला.

या उपक्रमाचा फायदा असा झाला, की मुलांना गतीने अभ्यास करण्याची सवय लागली. अपेक्षित अध्ययन निष्पत्ती पूर्ण होण्यास मदत मिळाली. एकमेकांच्या साहाय्याने सर्व मुलांमध्ये वाचण्यासाठी चढाओढ लागली. आज शाळेतील १००% मुले वाचन करतात. अंगणवाडीच्या मुलांना पण पुस्तके पाहण्याची, पुस्तके चाळण्याची सवय लागल्याने, त्यांनाही चित्रांची पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत. गावकरी मंडळी व पालकांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

जि. प. प्राथ. शाळा, रायपूर, ता. सेलू, जि. परभणी येथील एक पुस्तकप्रेमी शिक्षक आहेत. त्यांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, यासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. भाषा विषयातील पाठांच्या आणि अवांतर वाचनाच्या माध्यमातून परिचित होणाऱ्या विविध कवी व लेखकांकडे शाळेतील विद्यार्थी 'बोल मनातले' या उपक्रमांतर्गत पत्रलेखन आणि मोबाईलच्या माध्यमातून आपल्या मनातील भावना व्यक्त करतात. त्यांचा जीवनप्रवास जाणून घेण्यासाठी त्यांच्या मनात निर्माण झालेले प्रश्न विचारतात. आजवर थोर शास्त्रज्ञ महाराष्ट्रभूषण जयंत नारळीकर, लोकप्रिय कवी इंद्रजित भालेराव, मा. गिरिजा कीर, मा. रा. रं. बोराडे, कवी श्री. चंद्रकांत दादा वानखेडे, बालसाहित्यिक आबा महाजन, बाबा भांड, लीला शिंदे, डॉ. अशोक कौतिक कोळी, नामदेव कोळी, तुकाराम धांडे, मेघराज मेश्राम, शुभांगी चेतन, बबन शिंदे, अशोक मानकर इत्यादी थोर साहित्यिकांशी विद्यार्थ्यांनी संवाद साधला आहे. मुलांना साहित्याची गोडी लागावी आणि साहित्यिकांची ओळख व्हावी म्हणून परभणी येथे झालेल्या 'अमरेंद्र भास्कर बालकुमार साहित्य संमेलनात,' शाळेतील मुलांनी सहभाग घेतला. मुलांनी तेथे काव्यवाचन आणि कथाकथनही सादर केले. मुलांना साहित्य संमेलन प्रत्यक्ष अनुभवता आले. शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विविध उपक्रमांच्या, कार्यक्रमांच्या, संमेलनांच्या माध्यमातून वाचन व लेखनाची आवड निर्माण केली. अगदी तिसरीपासून ते आठवीपर्यंतचे विद्यार्थी काव्यलेखन व ललित लेखन करतात. त्यांचे लेखन नियिमतपणे विविध मासिकांतून प्रकाशित होत आहे. उदगीर येथे झालेल्या ९५ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात शाळेतील एक विद्यार्थी कथाकार, तर एक कवी असे दोघे जण निमंत्रित होते. दोघांनीही अतिशय चांगल्या पद्धतीने सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. उपक्रमशील शिक्षक माधव गव्हाणे यांना राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद, पुणे आणि रयत शिक्षण संस्थेचे सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'राज्यस्तरीय प्रबोधन यात्री' पुरस्कार २०१९ मध्ये प्राप्त झाला आहे, तसेच 'उपक्रमशील शिक्षक सन्मान' हा पुरस्कारही २०१९ मध्ये प्राप्त झाला आहे.

त्यांच्या प्रयत्नांतून एकातून दुसरा, दुसऱ्यातून तिसरा अशी उपक्रमांची शृंखला सुरू झाली. माधव गव्हाणे यांनी राबवलेल्या उपक्रमांची आपण ओळख करून घेऊ.

- जे आहे आमच्या मनात, ते उतरवतो वहीच्या पानात.
- काव्यांकुर
- बोल मनातले
- पुस्तक माझ्या नजरेतून
- दुसरी बाजू

पहिलीपासून सोबत असलेली मुले दुसरीपासून आपल्या मनातील भावना मुक्तपणे व्यक्त करू लागली आहेत. छोट्या छोट्या प्रसंगांविषयी बोलायला लागली आहेत. त्यांच्या मनातील विचार, कल्पना निर्भीडपणे त्यांच्या भाषेत, त्यांच्या शब्दांत मांडू लागली आहेत. त्यांचे हे व्यक्त होणे जपण्यासाठी त्यांच्या शब्दांना जपून ठेवणे गरजेचे वाटू लागले. यातूनच मुलांना हळूहळू लेखनाकडे वळवण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या उपक्रमांची सुरुवात केली आणि वाचन व लेखनाचा प्रवास सुरू झाला.

- **जे आहे आमच्या मनात, ते उतरवतो वहीच्या पानात :** दुसरीपासून मुक्तपणे विचार व्यक्त करू लागल्याने तिसरीच्या वर्गात येईपर्यंत मुले खूप मोकळेपणाने व्यक्त होऊ लागली, पण पुस्तकातील भाषेप्रमाणे आपल्याला भाषा येत नाही म्हणून मुले कधी कधी अडखळत होती. त्यांच्या मनातील बरेच विचार तेथेच कोंडले जात होते. त्यांची ही अडचण दूर करण्यासाठी मुलांना

एक उपक्रम दिला; तो म्हणजे 'जे आहे आमच्या मनात, ते उतरवतो वहीच्या पानात' अर्थात हे रोज लिहायचे होते. म्हणजे थोडक्यात दैनंदिनीच म्हणा ना! वर्गातील सर्व मुलांना या उपक्रमाचे महत्त्व समजावून सांगून सर्वांना सहभागी करून घेतले. यातून मुले अतिशय छान व्यक्त होऊ लागली. त्यांच्या मनातील अनेक विचार, प्रश्न, एखाद्या घटनेकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन व्यक्त करू लागली. मुलांच्या या दैनंदिनी वाचनाने मुलांच्या संवेदनशील मनाचे भाव उलगडत जाऊ लागले. त्यांच्या डायरीत शेती बहरत होती, पाखरे उडत होती, पावसाची चिंता दिसत होती. मायबापाच्या डोळ्यांतील आणि डोक्यातील प्रश्नांच्या नोंदी दिसत होत्या. आज बरीच मुले उद्याच्या भविष्यासाठी आपला वतर्मानकाळ वहीच्या पानात नोंदवत आहेत. हसत-खेळत आणि म्हणत 'जे आहे आमच्या मनात, ते उतरवतो वहीच्या पानात.' यातूनच पुढील उपक्रम सुरू झाला तो...

- **काव्यांकुर :** इयत्ता तिसरीपासून मुले कविता लिहायला लागली, कारण मनातील नोंदी वहीच्या पानावर नोंदवताना मुले आपल्या परिसरातील अनेक घटनांचे बारकाईने निरीक्षण करू लागली. यामुळे त्यांचा शब्दसंग्रह वाढला. ती हळूहळू आजूबाजूला दिसणारी परिस्थिती नीटपणे, अर्थपूर्णरीत्या यमकासोबत बांधून काव्यरचना करू लागली. त्यामुळे त्यांच्या कवितेतून त्यांचे मन बोलू लागले. हळूहळू त्यांच्या कविता फेसबुक आणि व्हॉट्सअॅप सारख्या माध्यमातून प्रसारित केल्या गेल्या. अनेक मान्यवरांनी खूप चांगला प्रतिसाद दिला, मार्गदर्शन केले, त्यांचे मत व्यक्त केले. हे सर्व मुलांना प्रेरित करणारे होते. यामुळे मुलांचा विश्वास वाढला. कोणीतरी केलेले आपले कौतुक हे त्या बालमनासाठी टॉनिक ठरले आणि लिहित्या हातासोबत लेखनाचा दर्जाही वाढत गेला. अनेक मुलांच्या कविता विविध वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्यामुळे लिहिणाऱ्यांची संख्या वाढतच जात होती. माहे जून, २०१९ च्या मुलांच्या लाडक्या किशोर मासिकात कु. वैष्णवी सिद्धार्थ म्हस्के या विद्यार्थिनीची 'माझी शाळा' ही कविता प्रकाशित झाली. शिवाय किशोरकडून या मुलीला ८० रुपये आणि वर्षभरासाठी किशोर मासिक बक्षीस म्हणून प्राप्त झाले. लगेच सप्टेंबर महिन्याच्या किशोरमध्ये चौथीच्या वर्गातील आदर्श आसाराम गाडेकर या विद्यार्थ्याची कविता प्रकाशित झाली. पुढे सोहम सुंदर उंडे, आर्यन गाडेकर, सरस्वती गजमल तसेच दुसरीच्या वर्गात शिकणारी निदा शेख या विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या कविता आणि प्रत्येकाचे एकेक चित्रही प्रकाशित झाले. त्यामुळे पालकांना खूप आनंद झाला.

- **बोल मनातले :** प्राथमिक वर्गातील कविता आणि पाठ हे खूप चांगले आणि मुलांच्या मनावर संस्कार करणारे असतात. हे पाठ, कविता मुलांच्या भावविश्वाला समृद्ध करतात, म्हणूनच मुलांना खूप आवडतात. आवडलेल्या कविता आणि पाठांविषयी मुलांना काय वाटत आहे, त्या पाठांतून, कवितांतून, कथांतून काय शिकायला मिळाले यांविषयी मुलांना लिहायला लावले. मुले मनमोकळ्या पद्धतीने व्यक्त होऊ लागली. त्यांना त्या लेखक, कवींविषयी आपुलकी वाटू लागली, त्यांच्यासोबत बोलावे वाटू लागले आणि त्यांचे हे बोलणे त्या पाठांविषयी, कवितांविषयी होते, त्यांच्या मनातील होते.

विद्यार्थ्यांच्या मनातील बोलणे पत्रांच्या माध्यमातून संबंधित कवी, लेखक यांच्यापर्यंत पोहोचवायला सुरुवात केली. पहिले पत्र इत्यत्ता तिसरीच्या 'रानवेडी' या कवितेचे कवी श्री. तुकाराम धांडे सरांना पाठवले. त्यांना खूप आनंद झाल्याचे माझ्या वर्गातील मुलांना त्यांनी फोनवरून सांगितले. आतापर्यंत अनेक विचारवंत, मान्यवर साहित्यिक यांना २६० पेक्षा जास्त पत्रे लिहून मुलांनी त्यांच्या मनातील बोल सांगितले आहेत. अनेक साहित्यिकांनी मुलांना पुस्तकांच्या माध्यमातून आशीर्वाद दिले आहेत.

- **पुस्तक माझ्या नजरेतून :** वरील उपक्रम घेत असताना विद्यार्थ्यांना पुस्तके मित्रासारखी वाटायला लागली. रोज दुपारच्या सुट्टीत शाळेतील आणि वर्गातील बरेचसे विद्यार्थी आपल्या आवडीची पुस्तके घेऊन वाचायला लागली. आवडीनुसार पुस्तके निवडू लागली. यात चरित्रात्मक, निसर्ग, पर्यावरण, विज्ञान, शास्त्रज्ञांची चरित्रे, समाजसुधारकांच्या चरित्रांविषयी माहिती देणारी पुस्तके विद्यार्थ्यांना आवडू लागली. यामुळे रोजची दुपारची सुट्टी पुस्तकांसोबत जायला सुरुवात झाली. पुस्तक कसे वाटले असे विचारल्यास हळूहळू बरीचशी मुले वाचलेल्या पुस्तकाविषयी जमेल तशी माहिती सांगायला लागली. पुस्तकाविषयी भरभरून बोलू लागली. पुस्तकातील आवडलेला भाग, न आवडलेला भाग, मुखपृष्ठ, मलपृष्ठ यांविषयीही बोलायला लागली.

  यानंतरची पुढची पायरी म्हणजे मुले पुस्तकांविषयी जे बोलत होती, तेच शब्दांमध्ये उतरविणे गरजेचे होते, म्हणून तुम्ही जे बोललात तेच तुमच्या शब्दांत लिहा, 'पुस्तक तुमच्या नजरेतून' लिहा असे सांगितले. मुलांना दैनंदिनी, पत्रलेखन, विविध प्रसंग यांवर लेखन करण्याची सवय असल्यामुळे ती पुस्तकाविषयी सुद्धा सहज लिहायला लागली. इयत्ता चौथीच्या मुलांनी 'आबांची गोष्ट' या आबा महाजन यांच्या पुस्तकाविषयी पहिल्यांदा लिहिले. ते आबा महाजन यांना पाठवून दिल्यानंतर त्यांनी ते फेसबुकवर पोस्ट केले. पोस्ट आणि त्यावर आलेल्या प्रतिक्रिया मुलांना वाचून दाखवल्यावर मुलांना खूप आनंद झाला आणि पुस्तकांवर लिहिणाऱ्यांची संख्या वाढायला लागली. कौतुक बळ देत असते. सुरुवातीला गोष्टीची पुस्तके दिली. पुढे बालकवितांची पुस्तके दिली. हळूहळू विज्ञान, भूगोल, निसर्ग, इतिहास, शास्त्रज्ञ, समाजसुधारक यांच्याविषयी चरित्रात्मक माहिती देणारी पुस्तके द्यायला सुरुवात केली. यामध्ये अनुवादित पुस्तकांचा सुद्धा खूप मोठा सहभाग होता. पुस्तके वाचून त्यावर मुले अतिशय चांगल्या पद्धतीने व्यक्त होत होती. या सर्व गोष्टींचे लेखनसुद्धा करून घेतले जात आहे. आजवर जवळ जवळ ९० पेक्षा जास्त पुस्तकांवर मुलांनी लेखन केलेले आहे. यात 'आबांची गोष्ट', 'जोकर बनला किंग मेकर' या पुस्तकांचे लेखक आबा महाजन आणि संजय वाघ यांना पत्रे पाठवली होती. या दोन्ही पुस्तकांना नंतर बालसाहित्य अकादमीचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

## दुसरी बाजू :

पत्रांच्या माध्यमातून मुलांनी लेखक, कवी यांना ते कसे घडले, त्यांनी वाचन कसे केले, काय वाचले, यांविषयी विचारले. त्यांच्या बालपणीच्या आठवणींबद्दल विचारले. जीवनातील संस्मरणीय घटनांबद्दल विचारले, त्यांच्या जीवनाचा प्रवास समजून घेतला. यामुळे मुलांना लेखक-कवी यांच्या जीवनातील दुसरी बाजू समजली.

लेखकांनी दिलेल्या प्रश्नांच्या उत्तरांनी मुलांना प्रेरणा मिळाली.

- **मुलांचे पुस्तकांशी नाते जोडताना :** युवराज माने हे जि. प. प्राथ. शाळा पारडी, ता. सेलू, जि. परभणी येथील उपक्रमशील शिक्षक आहेत. त्यांना वाटे, मुलांना स्वतःहून यावेसे वाटेल, आनंदाने शिकावे वाटेल असे सुंदर ठिकाण म्हणजे शाळा. असे वातावरण असलेली शाळा निर्माण करण्याचे स्वप्न माने सर पाहात होते. अशी शाळा निर्माण करण्याचा त्यांनी घेतलेला ध्यास आजही कायम आहे. शाळेच्या वेळेपूर्वीच धावतपळत येणारी मुले पाहून शिक्षकांना समाधान वाटते. शाळेने मुलांना लावलेला लळा हेच शिक्षकांच्या धडपडीचे फळ होय. ते म्हणतात, 'मुलांसाठी काहीतरी नवे नवे करण्याच्या कल्पना या मुलांच्या कृतीतून व वाचनात येणाऱ्या पुस्तकांतून माझ्या डोक्यात यायच्या आणि प्रत्यक्ष कृतीत उतरायच्या. गोंदिया जिल्ह्यात आदिवासी व नक्षलग्रस्त भागात काम करताना लक्षात आले, की येथे बोलीभाषेचा प्रभाव अधिक आहे. भाषा कोणतीही असो, पण मुलांचे मानसशास्त्र सर्व ठिकाणी सारखेच असते. मुलांच्या सहज कृतींतून अनेक कल्पना सुचतात. त्यातीलच एक म्हणजे वाचनाचा आनंदसोहळा!'

  एके दिवशी दुपारच्या सुट्टीत सरांच्या टेबलाभोवती आरती, साधना, वर्षा, मेघा, शिल्पा व गुलशन उभे राहून काहीतरी चर्चा करत होते. सरांच्या टेबलावर असलेल्या पुस्तकांची पाने चाळत आरती काहीतरी सांगत होती. सर्व जण ऐकत होते. मधेच मेघा काहीतरी दाखवत होती. हे सर्व सर खिडकीतून पाहात होते. सर वर्गात येताच वर्षा म्हणाली, ''गुरुजी, आम्हांला हे पुस्तक वाचून दाखवा ना!'' हे ऐकून सरांना खूप आनंद झाला. कारण सर या दिवसाची आतुरतेने वाट पाहात होते. मुलांनी स्वतःहून पुस्तकांकडे आकर्षित व्हावे, त्यांचे मन पुस्तकांकडे वळावे, यासाठी तर सर नियमितपणे टेबलावर, वर्गात, मुलांच्या नजरेस पडतील अशा ठिकाणी पुस्तके ठेवत होते. जेवणाच्या सुट्टीत सर स्वतः वर्गात पुस्तक वाचत बसायचे. त्यामुळे मुलेही वर्गात पुस्तके चाळायची, चित्रे पाहायची, पुस्तकांतील चित्रांवर चर्चा करायची. मुलांना वर्गात मांडलेल्या पुस्तकांची मुखपृष्ठे आकर्षित करायची. सर हे सर्व पाहात होते. मुले कधी एकदा स्वत:हून पुस्तके वाचू लागतील व नवनवीन पुस्तकांची मागणीही करतील याची ते वाट पाहात होते. अखेर ती प्रतीक्षा संपली. मुले पुस्तक वाचून दाखवण्याची मागणी करू लागली. मग दररोज दुपारी जेवणाच्या सुट्टीत डबा खाऊन झाल्यावर, कधी शाळेच्या मैदानात असलेल्या झाडाखाली, तर कधी वर्गखोलीत एकत्र बसून पुस्तक वाचन सुरू झाले.



मग शिक्षक म्हणून सरांचा व विद्यार्थ्यांचा पुस्तक वाचनाचा प्रवास सुरू झाला आणि या प्रवासात पहिले पुस्तक हाती आले ते म्हणजे डॉ. आ. ह. साळुंखे सरांचे 'चांदण्यात भिजायचे राहून जाऊ नये म्हणून'. त्यांनी अगदी एका दमात ते पुस्तक वाचून पूर्ण केले. पुस्तक वाचताना प्रत्येक लेखातून अंगावर शीतल चांदणे पडल्याचा त्यांना अनुभव आला आणि हे समजले, की

*पुस्तक वाचन म्हणजे आनंद असतो.*

*पुस्तक वाचनाने माणूस दररोज नवा होतो.*

*पुस्तक वाचनाने माणूस समृद्ध होतो.*

मुले वेगवेगळ्या वयोगटानुसार पुस्तकांची निवड करू लागली. वेगवेगळ्या मासिकांची मागणी करू लागली. जवळपास सर्वच वर्गांमध्ये झुलते वाचनालय, वाचन कोपरा आणि वाचन पेटीची रचना केली. शासकीय पातळीवरून शाळेला मिळालेल्या पुस्तकांच्या पेट्या खुल्या करण्यात आल्या. वर्गात लटकणाऱ्या पुस्तकांत, वाचन कोपऱ्यात स्थानापन्न झालेल्या अनेक शब्दप्रभूंची मांदियाळी मुलांना आता खुणावू लागली. मुलांना वाचनाची गोडी लागली. दुपारी जेवणाच्या सुट्टीमध्ये मुले कधी कथा, तर कधी कविता, तर कधी एखाद्या पुस्तकाचे प्रकटवाचन करू लागली. काही मुले आजूबाजूला बसून ते ऐकू लागली. वाचन सोहळा नित्यनेमाने सुरू होता. मुलांसाठी प्रसिद्ध होणारे किशोर मासिक शाळेपर्यंत यायचे. त्यातीलच एका मासिकामधील 'विश्वासाचा परिसस्पर्श' ही प्रवीण दवणे यांची कथा मुलांना वाचून दाखवली. मुलांच्या भावविश्वातील प्रसंग त्यामध्ये होते. त्यामुळे मुलांना खूप आनंद झाला. मुलांच्या चिमुकल्या हातांनी आपसूकपणे टाळ्यांचा गजर केला. पुढे त्याच मासिकामधील 'आठवणीतील भाऊबीज' ही बबन शिंदे यांनी लिहिलेली कथा मुलांना वाचून दाखवली. कथा वाचून पूर्ण होताच मुलांच्या डोळ्यांकडे पाहिले, तर मुलांच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. हा लेखकाचा फार मोठा विजय होता. मुलांच्या हृदयापर्यंत पोहोचणे आणि हृदय जिंकणे हे ज्याला जमले, त्याने बालमनाचा ठाव घेतला, असे समजावे. या दोन्ही शब्दप्रभूंना मुलांकरवी पत्रे लिहून कृतज्ञता व्यक्त केली. मुलांच्या पत्राला त्याच तत्परतेने दोन्ही लेखकांनी उत्तरे दिली. तिथून पुढे 'पत्रमैत्री' असा उपक्रम सुरू झाला. डॉ. आ. ह. साळुंखे सरांनी 'कृतज्ञता हा सर्वांत मोठा संस्कार आहे.' हा गुरूमंत्र शब्दबद्ध करून शाळेतील मुलांसाठी पाठवून दिला. ज्ञान व आनंद देणाऱ्या प्रत्येक लेखकाविषयी मुले आता कृतज्ञता व्यक्त करू लागली.

आनंदाच्या वाचनसोहळ्यामध्ये मुलांची संख्या झपाट्याने वाढू लागली. वाचनाच्या आनंदसोहळ्यामध्ये महाराष्ट्रातील अनेक शब्दप्रभू मुलांसोबत येऊन संवाद साधू लागले. कधी छान कविता, तर कधी विज्ञानातील रंजक गोष्टी मुलांच्या गळी उतरवू लागले. अगदी वर्ग पहिली ते आठवीपर्यंतची मुले एकाच वेळी या वाचनाच्या आनंदसोहळ्यात सहभागी होऊ लागली मुलांच्या वाचनाच्या आवडी-निवडी सरांच्या लक्षात येऊ लागल्या. लहान मुलांना चित्रांची व मोठ्या अक्षरांची पुस्तके आवडू लागली. लहान मुलांसाठी रंगीबेरंगी चित्रांची पुस्तके, कवितांची पुस्तके वेगळी करून त्यांच्यासाठी खेळणी स्वरूपात त्यांच्यासमोर मांडू लागले. वरिष्ठ वयोगटातील मुलांसाठी माहितीपर व कुतूहलपर पुस्तकांची मांडणी करून कोपऱ्यांमध्ये ठेवू लागले. इयत्ता पाचवी ते आठवी या वयोगटातील मुले आत्मचरित्रात्मक पुस्तकांची मागणी करू लागली. मुलांचे वाचन कधीच एकसुरी नसते. त्यांना कधी जादूची तर कधी पक्ष्यांची, प्राण्यांची, जंगलातील गोष्टींची, तर कधी आजूबाजूला दिसणाऱ्या, घडणाऱ्या गोष्टींची अशी सगळीच पुस्तके आवडतात. शाळेत सर्वच वर्गांत पुस्तके मांडल्यामुळे मुलांना पुस्तक निवडण्याचे स्वातंत्र्य मिळू लागले. काय वाचले हे स्वतःहून सांगितले, तर छानच; मात्र त्यांच्या पाठीमागे कधी तगादा लावला नाही. एकदा वाचनाची गोडी लागली, पुस्तकावर प्रेम जडले, की मग पुस्तके मुलांना आयुष्यभर साथ करतील असा सरांचा ठाम विश्वास होता. मुलांबरोबर काम करताना त्यांना एक गुपित सापडले. लहानपणापासूनच पुस्तके वाचून दाखवली, तर मुलांची पुस्तकांशी नाळ जोडली जाते. पुस्तकांचे प्रकटवाचन करून दाखवले, त्यातील गमतीजमती

मुलांपर्यंत पोहोचवल्या, की त्यांना पुस्तके आवडू लागतात. केवळ मुलांच्या हातात पुस्तक देऊन आपले काम संपणार नाही याची जाणीव त्यांना एक गुरुजी म्हणून झाली. आणि 'वाचनाचा आनंदसोहळा' या उपक्रमासोबतच इतरही उपक्रम निर्माण झाले.



**शनिवार आमचा वाचनाचा :** मुलांना केवळ शनिवारी पुस्तके वाचण्यासाठी दिली जातात. शाळेतील सर्व पुस्तके शाळेच्या मैदानावर रांगोळी प्रमाणे पसरून ठेवली जातात. मुलांनी त्यांपैकी कोणतेही आपल्या आवडीचे पुस्तक घ्यायचे. परिसरात बसून पुस्तक वाचायचे आणि वाचलेल्या पुस्तकांवर मित्रांसोबत चर्चा करायची असा हा उपक्रम मुलांचा आवडता झाला.

**शिदोरी :** 'शिदोरी' या वहीमध्ये मुलांनी वाचलेल्या पुस्तकांची नोंद केली जाते. पुस्तकात काय वाचले याविषयीचे परीक्षण त्यात लिहिले जाते. अशी 'शिदोरी' नावाची वही प्रत्येक मुलाला देण्यात आली.

**अमृतकण :** पुस्तकातील मनाला भावलेल्या वेगवेगळ्या ओळी, सुविचार, म्हणी किंवा शाळेत गुरुजी बोलत असताना आलेली विधाने मुले 'अमृतकण' वहीमध्ये लिहू लागली. या अमृतकणांचा भाषणांमध्ये, निबंधांमध्ये किंबहुना रोजच्या बोलण्यामध्ये उपयोग करू लागली.

**चला अमृतकण वाटूया :** मुले आठवडाभरात जमा केलेले अमृतकण दर गुरुवारी एकमेकांना वाचण्यास देऊ लागली. एकमेकांनी जमा केलेले अमृतकण आपल्या वहीमध्ये लिहून घेऊ लागली.

**पुस्तकभिशी :** इयत्ता पाचवी ते आठवीच्या मुलांसाठी 'पुस्तक भिशी' हा उपक्रम सुरू केला. प्रत्येक मुलाने प्रत्येक महिन्याला २० रुपये जमा करायचे. ज्या मुलाचा नंबर लागेल त्या मुलाला जमा झालेल्या राशीतून पुस्तके मिळू लागली.

**लेखक आपल्या भेटीला :** प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या शनिवारी परिसरातील लेखक, कवी, कलावंताना मुलांच्या भेटीसाठी शाळेत पाचारण करण्यात येऊ लागले. त्यातून लिहिणारी माणसे मुलांच्या समोर येऊ लागली. पुस्तकातील माणसे प्रत्यक्ष पाहायला मिळणे हा मुलांना एक भाग्ययोग वाटू लागला.

**पुस्तक परीक्षण :** परिपाठाच्या वेळी दररोज एक विद्यार्थी वाचलेल्या पुस्तकाविषयी आपण लिहिलेले पुस्तक परीक्षण सादर करू लागला; ज्यातून सर्व मुलांना त्या पुस्तकाचा परिचय होऊ लागला. मुलांच्या सादरीकरणातून त्यांनी ग्रहण केलेले ज्ञान इतर मुलांनाही मिळू लागले.

**पुस्तक प्रदर्शन :** दर तीन महिन्यांनी शाळेच्या पटांगणावर शाळेतील पुस्तकांचे, मुलांनी स्वतःच्या संग्रहात जमा केलेल्या पुस्तकांचे व शिक्षकांकडे संग्रही असणाऱ्या पुस्तकांचे प्रदर्शन भरवण्यात येऊ लागले; ज्यातून मुलांना अनेक पुस्तकांची माहिती मिळू लागली.

**पुस्तक पासबुक :** प्रत्येक वर्गशिक्षकाच्यावतीने 'पुस्तक पासबुक' उपक्रम सुरू करण्यात आला. यामध्ये १०० पानांचे पुस्तक किंवा १००० पानांचे वाचन पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यास बक्षीस देण्यात येऊ लागले. यातून मुलांमध्ये अधिकाधिक पाने वाचण्याची चढाओढ सुरू झाली. यातून वाचनाची गोडी निर्माण होऊ लागली.

**बालसाहित्य कृतज्ञता पुरस्कार :** वर्षभरात वाचनाच्या आनंदसोहळ्यात किंबहुना मुलांच्या वाचनात आलेल्या पुस्तकांतून ५ पुस्तकांची निवड मुलांच्या हस्ते करण्यात येऊ लागली. या ५ पुस्तकांच्या लेखकांना बालसाहित्य कृतज्ञता पुरस्कार आम्ही शाळेच्यावतीने देऊ लागलो.

**उत्कृष्ट वाचक पुरस्कार :** वर्षभरात ज्या विद्यार्थ्याने अधिकाधिक पुस्तके वाचली असतील, त्यांचे परीक्षण केले असेल, अशा विद्यार्थ्यांना २६ जानेवारीला उत्कृष्ट वाचक म्हणून गौरविण्यात येऊ लागले.

**मोबाईलवरून लेखकांशी संवाद :** मुलांना आवडलेली कथा, कविता किंवा पुस्तक यांच्या लेखकाशी मोबाईलद्वारे बोलण्याची संधी दिली जाऊ लागली; ज्यातून मुलांना प्रत्यक्ष लिहित्या हाताशी संवाद साधण्याचा आनंद मिळाला.

**शाळेसाठी आईचे पुस्तक दान :** बहुतांश वेळा मुलांचे वडीलच शाळेत येतात. आई कधीतरी शाळेत येते. एका निमित्ताने आई शाळेत यावी व शाळेतील मुलांसाठी तिने काहीतरी द्यावे; यासाठी मकरसंक्रात या सणाला प्रत्येक मुलाच्या आईला शाळेत बोलावून, सर त्यांच्याकडे पुस्तकाचे दान मागू लागले. याला त्यांच्याकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि मुलांसाठी पुष्कळ पुस्तकांची उपलब्धता होऊ लागली.

**कविता/कथा वाचूया - चित्र काढूया :** वाचनाच्या आनंदसोहळ्यात एखादी कविता/कथा मुलांना वाचून दाखवण्यात येऊ लागली. मुलांनी त्यावर आधारित चित्र काढायचे असे ठरले. यातून अनेक चांगले चित्रकार समोर येऊ लागले.

आपल्या विद्यार्थ्यांना दैवत समजणाऱ्या युवराज माने सरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणतात, ''मुलांना वाचनाकडे वळवताना हे सर्व उपक्रम मला वरदान ठरले. मुले पुस्तकाकडे वळली पाहिजेत, वाचती झाली पाहिजेत यासाठी माझी धडपड आजही तितक्याच श्रद्धेने सुरू आहे.'' अशा ध्येयनिष्ठ शिक्षकांची शिक्षणक्षेत्राला खरीच गरज आहे.

अशी अनेक चांगली शिक्षक मंडळी महाराष्ट्रात आहेत, ज्यांनी आपल्या शाळेत विविध उपक्रम, कार्यक्रम, राबवून विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावली व ज्ञानाची दालने खुली केली. हे सर्व विस्ताराने लिहिण्याचा उद्देश असा की, या उपक्रमांतून इतर शिक्षकांना प्रेरणा मिळावी व त्यांनीही असे उपक्रम आपल्या शाळेत राबवून आपल्या विद्यार्थ्यांना वाचते करावे व त्यांच्यासाठी ज्ञानाची दारे उघडी करावीत.

■■■

**(पृष्ठ क्र. १४ वरून)**

वर्गात लावले होते. त्यातील एक तक्ता मुलांच्या नावाचाच होता. जना, पांडू, चंपा, लीला, महादू, नानू, विजया, क्षमा अशी नावे त्या तक्त्यात लिहिली होती. विशेष म्हणजे इयत्ता पहिलीतील मुले तक्त्यातील सर्व नावे वाचून दाखवू शकत होती. केवळ मुलांच्या नावाचाच तक्ता होता असे नाही. मुलांच्या मातांच्या नावाचाही एक तक्ता होता. बहुतांश मुले त्या तक्त्यातील नावे वाचत होती. ही मुले वाचायला कशी शिकली, हे जेव्हा शिक्षकांनी सांगितले, तेव्हा खूपच आनंद वाटला.

अशा प्रकारचे अनेक तक्ते तयार करता येतील. उदा. परिसरातील झाडांच्या नावांचा तक्ता, गावांच्या नावांचा तक्ता, धान्यांच्या नावांचा तक्ता, इत्यादी. असे तक्ते करणे फारसे अवघड नाही.

वरील सर्व उपक्रमांचा विचार करताना एक बाब प्रामुख्याने लक्षात आली असेल, की मुलांना वाचते करण्यासाठी निरनिराळ्या पैलूंचा आधार घेणे उपयुक्त ठरते. प्रत्येक शाळेचा चेहरामोहरा निराळा असतो. गावठाणे निराळी, परिसर निराळा, गावाच्या परंपरा निराळ्या, मुलांचे अनुभवविश्व निराळे, भावविश्व निराळे. या सर्वांचा विचार करून तेथील शिक्षकाने वाचन शिकवण्याचे विविधांगी उपाय योजले पाहिजेत; असे झाले तरच शिकणे व शिकवणे या दोन्ही क्रिया आनंददायी होतील व मुले प्रगतिपथावर राहतील.

■■■

# वाचाल तर वाचाल

**सायली महाजन**
रचना विद्यालय (माध्यमिक)
नाशिक.
भ्रमणध्वनी : ९४२३९६८५२६

*मातृभाषेतील पुस्तके आपण वाचतोच, पण इंग्रजी विषयाची गोडी लागणे, इंग्रजी पुस्तके वाचणे, हेही महत्त्वाचे आहे मातृभाषेप्रमाणे मुलांना इंग्रजीही उत्तम वाचता यायला हवे. इंग्रजी वाचता येण्यासाठी केलेले प्रयत्न, त्यातून आलेले अनुभव यांवर आधारित लेख.*

*पुस्तकाबरोबरच ई–बुकचे वाचन, वृत्तपत्रांचे वाचन अशा विविध प्रकारच्या वाचनाचे महत्त्व सांगतानाच वाचनाने घडलेल्या थोर व्यक्तींची उदाहरणे देत वाचनाचे महत्त्व पटवून देणारा हा लेख.*

शाळेत प्रवेश घेतल्यापासून आपण हे वाचत आलेलो आहोत किंवा ऐकत आलेले आहोत, 'वाचाल तर वाचाल', पण किती जण यावर विचारमंथन करतात किंवा किती मुलांना याचा अर्थ समजतो! वाचनाची सवय आपल्याला समृद्ध करते म्हणूनच शाळा लहानपणापासून विद्यार्थ्यांना वाचनास प्रवृत्त करतात.

मुलांनो, तुम्हांला माहीत आहे का? स्वामी विवेकानंद हे जगासाठी स्वामी विवेकानंद कसे बनले ते? वाचनातूनच बरे का! स्वामी विवेकानंद म्हणजे छोटा नरेंद्र हा लहानपणापासून भरपूर वाचन करायचा. कोलकात्याच्या या नरेंद्रला बालपणापासूनच वाचनाची अतिशय गोडी होती. मग काय नरेंद्र ग्रंथालयात जाऊन भरपूर पुस्तके घेऊन जायचा आणि पुन्हा दुसऱ्या दिवशी आणून द्यायचा आणि पुन्हा नवीन पुस्तके ग्रंथपालांकडे मागायचा. त्या ग्रंथपालांना वाटायचे, की हा मुलगा नुसतीच पुस्तके घेऊन जातो आणि दुसऱ्या दिवशी न वाचताच आणून देतो, म्हणून एके दिवशी ते नरेंद्रवर चिडले व म्हणाले, ''काय रे, एवढी पुस्तके घेऊन जातोस आणि तशीच आणून देतोस.'' छोटा नरेंद्र म्हणाला, ''मी सगळीच पुस्तके वाचत असतो.'' ''एका दिवसात तुझी एवढी पुस्तके वाचून होतात?'' ते ग्रंथपाल म्हणाले. नरेंद्र म्हणाला, ''हो विचारा मला या पुस्तकांमधल्या एखाद्या पुस्तकातील एखाद्या विशिष्ट पानावर काय आहे ते'' आणि खरेच त्या ग्रंथपालांनी नरेंद्रची परीक्षा घेतली आणि ते अचंबित झाले, कारण नरेंद्र ही सगळी पुस्तके वाचत तर होताच, पण त्या सगळ्या पुस्तकांचे विषयही त्याला तोंडपाठ होते. हा नरेंद्र म्हणजे आपले स्वामी विवेकानंद बरे का!

मी इंग्रजी विषयाची शिक्षिका. बऱ्याचदा मी मुलांना इंग्रजीचे वाचन करता येते की नाही हे तपासून बघत असते. कोविड–१९ नंतर तर वाचनाच्या बाबतीत परिस्थिती अधिकच बिकट झाली होती. माझ्या वर्गातील मुलांना वाचनाची सवय लावण्यासाठी मी वेगवेगळे उपक्रम राबवत असते. ज्या मुलांना इंग्रजी वाचन करता येत नाही, अशा मुलांची वाचन करता येणाऱ्या मुलांच्या सोबत जोडी लावून दिल्यास; दोन तासांच्या मधे, पाच मिनिटांमध्ये किंवा रिक्त तासिकेमध्ये शेजारी बसणारा मित्र आपल्या शेजारच्या वाचता न येणाऱ्या मित्राचे दोन दोन, तीन तीन ओळींचे वाचन करून घेऊन, शिक्षकांना मदत करत असतो. दिवाळीच्या सुट्टीत किंवा नाताळच्या सुट्टीत अशी मुले एका मिनिटाचा वाचनाचा ऑडिओ दररोज मला पाठवत असतात. मला व्हॉट्सअॅप करत असतात आणि मी या मुलांचे दररोज पाठवलेले ऑडिओज माझी कामे करता करता ऐकत असते.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

वर्गामध्ये इंग्रजीचा कोपरा, 'इंग्लिश कॉर्नर' सुद्धा तयार करत असते आणि या इंग्लिश कॉर्नरमध्ये विद्यार्थ्यांना दररोज इंग्रजी वर्तमानपत्र आणि ते वाचत असताना अडणाऱ्या शब्दांचे अर्थ बघता यावेत म्हणून डिक्शनरी, इंग्रजी गोष्टींची पुस्तके आणि इंग्रजी मासिके असे उपलब्ध करून देत असते. मग मधल्या सुट्टीत लवकर डबा खाऊन, उरलेला वेळ मुले सत्कारणी लावतात, वाचन करत असतात. या इंग्लिश कॉर्नरमधील उपलब्ध वाचन साहित्याचा उपयोग आपले इंग्रजीचे ज्ञान किंवा इंग्रजीचे शब्दभांडार वृद्धिंगत करण्यासाठी करत असतात.

ग्रंथालयातसुद्धा बालसाहित्य भरपूर आहे. मधल्या सुट्टीत मुलांना सहज हाताळता येतील आणि सहजपणे पुस्तक हाती घेऊन मधल्या सुट्टीतील दहा-पंधरा मिनिटांत त्यांना वाचता येतील अशी मासिके, हिंदी, इंग्रजी, संस्कृत भाषेमध्ये असलेले शैक्षणिक साहित्य ग्रंथालयामध्ये उपलब्ध करून दिले जाते आणि जसे भूक लागल्यानंतर आपण आपल्या जेवणावर तुटून पडतो तसे मधल्या सुट्टीमध्ये ही मुले पुस्तकांवर तुटून पडतात आणि जेवढे वाचून घेता येईल तेवढे त्या वेळात वाचून घ्यायचा प्रयत्न करतात. ज्याला वाचनाची गोडी आहे तो हरप्रकारे आपल्या दैनंदिन अभ्यासाच्या व्यस्ततेतून वेळ काढून काहीतरी वाचतोच; मग ते मराठी वृत्तपत्र असो की इंग्रजी. आमच्या शाळेच्या ग्रंथपाल या शाळेच्या माजी विद्यार्थिनी होत्या. त्यांनी आपल्या प्रदीर्घ सेवेत शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या आवडीनुसार भरपूर पुस्तके उपलब्ध करून दिली. विदेशात असलेले किंवा चित्रपट आणि दूरदर्शन मालिकांमध्ये काम करणारे आजी-माजी विद्यार्थी नाशिकमध्ये आल्यावर त्यांना भेटल्याशिवाय जात नाहीत. माजी विद्यार्थ्यांनी समाज सहभागातून पाच लाख रुपये जमवून रचना ग्रंथालय समृद्ध आणि सुशोभित केले आहे.

'गुड रीड डॉट कॉम', ज्यांना हातात पुस्तके घेऊन वाचायला आवडत नाही त्यांच्यासाठी मोबाईलमध्ये आपण आपल्या आवडीचे पुस्तक डाऊनलोड करून घेऊ शकतो आणि मग जेव्हा जेव्हा आपल्याला वेळ मिळेल तेव्हा तेव्हा आपण ते पुस्तक मोबाईलमध्ये ओपन करून त्याचे वाचन करू शकतो आणि अशी अगणित पुस्तके उपलब्ध आहेत बरं का, या गुड् रीड डॉट कॉम वर! नानाविध विषयांवरचे म्हणजे जसे फॅन्टसी, ॲडव्हेंचर्स किंवा फेअरी टेल्स किंवा हिस्टॉरिकल बुक्स, हॉरर स्टोरीज, साय फाय नॉव्हेल्स आणि अजून खूप काही.

आपण वाचलेल्या पुस्तकांचे बुक रिव्ह्यू लिहून आपण इतरांना सुद्धा वाचनासाठी प्रेरित करू शकतो. आमच्या इंग्रजी विषयामध्ये हा अभ्यासाचा भागच झालेला आहे. मित्रांनो, रेडिओ, टीव्हीसारख्या कार्यक्रमांमध्ये सुद्धा बुक रिव्ह्यूचा समावेश करण्यात आलेला आहे. तुम्ही वाचलेल्या पुस्तकांबद्दलचे समीक्षण म्हणजे बुक रिव्ह्यू रेडिओवरून सांगून, तुम्ही श्रोत्यांनासुद्धा वाचनासाठी प्रवृत्त करू शकता.

### वाचन का करायला हवे ? :

वाचनामुळे आपली बुद्धी प्रगल्भ होते; म्हणजे काय तर आपले विचार समृद्ध होतात. आपण बोलताना अतिशय अर्थपूर्ण आणि उत्कृष्ट बोलू शकतो. आपली संभाषण शैलीसुद्धा वाचनामुळे समृद्ध होते. आपण वक्तृत्व स्पर्धेमध्ये भाग घेतो. आपण निबंध लेखन स्पर्धेमध्ये भाग घेतो. आपले भरपूर वाचन असेल, तर आपण निश्चितच या स्पर्धांमध्ये पारितोषिके पटकावतो. निबंध लेखनात किंवा वक्तृत्व स्पर्धेमध्ये आपण वेगवेगळे संदर्भ सांगतो, उत्कृष्ट दाखले देतो, मोठमोठ्या साहित्यिकांचे, शास्त्रज्ञांचे, विचारवंतांचे विचार आपण 'कोट' करून सांगतो, प्रसिद्ध संतांचे दृष्टांत सांगतो यामुळे भाषण परिणामकारक होते. वाचनाच्या सवयीमुळे हे सर्व आपण करू शकतो. आपण वाचलेले आत्मसात करत असतो आणि अभिव्यक्त होत असतो.

**(पृष्ठ क्र. ३१ वर)**

# वाचनाच्या पाऊलवाटेने...

**संदीप वाकचौरे**
जि. प. शाळा. कोंची ता. संगमनेर
जि. अहमदनगर
भ्रमणध्वनी : ९४०५४०४५००

*शिक्षणप्रक्रियेत वाचन हे मूलभूत कौशल्यात येते. वाचनाचा परिपूर्ण संस्कार शालेय वयातच होणे गरजेचे आहे. या वाचनाची सुरुवात कशी होते, त्याचा आरंभ चित्र वाचनापासून होऊन पुढे कशी गती प्राप्त होते याचे विवेचन करणारा लेख.*

लियो टॉलस्टॉय म्हणाले होते, की 'मला जीवनात तीन गोष्टी हव्या आहेत. त्या तीन गोष्टी म्हणजे पुस्तक, पुस्तक आणि पुस्तक.' जीवनात पुस्तकांचे स्थान किती महत्त्वाचे आहे, हे त्यांच्या एका विधानातून कळते. प्रबोधनकार ठाकरे म्हणाले होते की, ''ज्यांची मस्तके पुस्तके घडवितात ते कोणाच्याही चरणांवर नतमस्तक होत नाहीत.'' पुस्तके नेमकी काय करतात? हे त्या एका विधानातून समजते. ही पुस्तके शालेय जीवनात हाती आली आणि ती वाचण्याची सवय अंगी बाणली, तर व्यक्तीच्या जीवनात परिवर्तन झाल्याशिवाय राहणार नाही. शालेय जीवनात वाचनाची आवड निर्माण करण्याचे आव्हान पेलले गेले, तर शिक्षणाची गुणवत्ता साध्य करण्याबरोबर अनेक सामाजिक प्रश्नांच्या मुळावर घाव घालणे शक्य आहे. खरे तर, प्राथमिक स्तरावर वाचनकौशल्य विकसित करण्यासाठी मोठ्या प्रयत्नांची गरज असते. त्या प्रयत्नांत आपण किती यशस्वी होतो, यावर मोठे यश अवलंबून असते. आज मुलांना वाचता येते; पण तरीसुद्धा पुस्तके वाचली जात नाहीत, याचे कारण वाचनकौशल्य आले, तरी ते केवळ तांत्रिकदृष्ट्या साध्य झालेले कौशल्य आहे. कृष्णकुमार म्हणतात की, ''ज्यांना वाचता येत नाही, त्यांना आपण अशिक्षित म्हणतो, पण वाचता येत असूनही जी माणसे वाचत नाहीत, त्यांना काय म्हणायचे?'' वाचतात, पण वाचलेले कळत नाही, वाचले त्याचे नीट आकलन होत नाही, असेही अनेक जण आहेतच. वाचनकौशल्याचा विचार गंभीरपणे न केल्यास शिक्षणाचा प्रवास कच्चा राहतो. वाचनापासून दुरावल्याने व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यातही आपण कमी पडत असतो. त्यामुळे वाचनाचा परिपूर्ण संस्कार शालेय वयात होण्याची गरज आहे, म्हणून पाश्चात्त्य देशात वाचनासाठी स्वतंत्र तासिका समाविष्ट केल्या आहेत, तर काही देशात वाचन हा स्वतंत्र विषय मानला जातो; याचे कारण वाचणारी माणसे प्रगत बनतात आणि प्रगत असलेल्या माणसांच्या समूहाने समाज आणि राष्ट्र प्रगत होत असते.

भाषेची चार कौशल्ये मानली जातात. त्यातील वाचन हे तिसऱ्या क्रमांकाचे कौशल्य आहे. भाषेतील कोणतेही कौशल्य हे स्वतंत्रपणे शिकून चालत नाही. ती एकमेकांशी जोडलेली असतात, मात्र त्यासाठी स्वतंत्र उपक्रम हाती घेतले, तरी त्यातून इतर कौशल्येदेखील साध्य होत असतात. श्रवण, भाषण, वाचन आणि लेखन या भाषा कौशल्यांतील श्रवण हे पहिले कौशल्य आहे. त्यामुळे श्रवण कौशल्यासाठी आरंभापासून अधिकाधिक प्रयत्न करण्याची गरज असते. श्रवणासाठी मुलांना गोष्टी, गाणी, बडबडगीते ऐकविणे महत्त्वाचे असते. मुळात जेव्हा आपण मुलांना विविध गाणी, बडबडगीते, गोष्टी ऐकवतो, तेव्हा मुलांना त्या गोष्टींतील पात्रांशी एकरूप

होऊन आनंद मिळत असतो. श्रवणातून नवनवीन शब्द कानावर पडत असतात. त्यातून मुलांच्या मनात पुढे काय? अशा प्रकारची जिज्ञासा निर्माण होण्यास मदत होत असते. पात्रातील संवाद मुलांना आनंद देत असतो. जितका श्रवण अनुभवावर भर दिला जाईल, तितक्या मोठ्या प्रमाणावर पुढील कौशल्यांसाठीचा प्रवास सुलभ होत जातो. मुले त्या गोष्टींशी एकरूप होतात, तेव्हा त्या गोष्टींतून मुले संवादाची भाषा शिकत असतात. श्रवणावर अधिक भर दिला गेला, तर पुढील कौशल्यांसाठी त्याची मदत होते असते. आपल्याला भाषण कौशल्य विकसित करायचे असेल, तर श्रवणावर भर देण्याची गरज असते. मुलांना आरंभापासूनच अधिकाधिक भाषणासाठीच्या संधी उपलब्ध करून देण्याची गरज असते. त्यासाठी प्राथमिक स्तरावर वेगवेगळ्या संधी शोधण्याची जबाबदारी शिक्षकांवर येऊन पडते. अशा अनेक संधी खरे तर वर्गातील विविध पाठ, तसेच परिसरातील विविध प्रसंग, घटना यांच्या निमित्ताने मिळत असतात. मुले जे ऐकतात, त्यातील ऐकलेल्या गोष्टींतील नवनवीन शब्दांचे उपयोजन आपल्या बोलण्यात करत असतात. त्यातून त्यांचे भाषण कौशल्य विकसित होत असते. बोलण्यासाठीची भाषा ऐकण्यातून, वाचनातून विकसित होत असते. बोलण्याच्या निमित्ताने शब्द, वाक्प्रचार, म्हणी, शैली, वाक्यरचना यांसारख्या अनेक गोष्टी सातत्याने शिकणे होत असते. कृष्णकुमार म्हणतात की, 'प्राथमिक शाळांनी श्रवण आणि भाषणासाठी अधिकाधिक वेळ द्यायला हवा. ज्या शाळेत मुलांना बोलण्यासाठी संधी उपलब्ध करून दिली जात नाही, त्या शाळा निरुपयोगी आहेत.' एका अर्थाने आपल्याला वाचनप्रवास उत्तम करायचा असेल, तर या दोन्ही कौशल्यांच्या विकासावर अधिकाधिक भर देण्याची गरज आहे.

वाचन हे औत्सुक्याचे बोट धरून पुढे जात असते. कृष्णकुमार म्हणतात की, 'जोपर्यंत अक्षर ओळख होत नाही, तोपर्यंत मुलांना वाचते कसे येईल; असा विचार केला जातो, पण तो विचार काही खरा नाही. वाचन म्हणजे अक्षरांची ओळख नाही. वाचन ही गोष्ट अक्षर ओळखीपेक्षा फार वेगळी आहे. आपण तसा प्रयत्न केला तर मग आरंभी अक्षर ओळख, मग वाक्य आणि मग वाचन हा प्रवास अधिककाळचा असेल. असे गृहीत धरून प्रवास केला, तर त्यातून वाचन प्रवास कच्चा राहण्याची शक्यता अधिक आहे. जेव्हा मूल शब्द वाचत असते, तेव्हा त्या शब्दांचे वाचन म्हणजे त्या आशयात प्रवेश करणे नाही. मुले एखादी गोष्ट ऐकताना जितक्या सहजपणे एकरूप होतात, तितके तांत्रिकदृष्ट्या वाचन शिकलेले मूल वाचनात रमत नाही. त्यातील पात्रे, भाषा, घटना यांत जितकी एकरूपता असते, तितकी एकरूपता तांत्रिक स्वरूपातील वाचन करताना येत नाही, हे वास्तव आहे. त्यामुळे वाचनासाठीचे भावविश्व अगोदर निर्माण करण्याची गरज असते. आपण जेव्हा वाचन कौशल्यांच्या दिशेने प्रवास करत असतो, तेव्हा वाचनापूर्वी चित्रांचा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो.

आपल्या पाठ्यपुस्तकात प्राथमिक स्तरावर आशयाबरोबर मोठ्या प्रमाणावर चित्रांचा समावेश आहे. पाठ्यपुस्तकात कशासाठी हवी आहेत चित्रे? दप्तराचे ओझे कमी करायचे असेल, तर पाठ्यपुस्तकातील चित्र कमी केली तरी बरेच ओझे कमी होऊ शकेल. तसेही चित्रं हा काही शिकण्या-शिकवण्याचा भाग नाही. मुलांना वाचन-लेखन शिकवायचे असते, तर त्याकरता अक्षरे, शब्द, पाठ आहेतच की! चित्रांमुळे विनाकारण पुस्तकांची पाने वाढतात.' असा विचार केला जात असतो. अगदी शाळा सुरू झाल्यानंतर नवीकोरी पुस्तके हाती आली, की सर्वप्रथम पुस्तकाची काळजी म्हणून पुस्तकांना आवरण घालण्याच्या सूचना शाळेत दिल्या जातात. पालकही काळजी घेत असतात. त्यामुळे त्या मुखपृष्ठाचा उपयोग होत नाही. एकूणच चित्र हा शिकण्याचा भाग

मानला जात नाही. चित्र आणि मुलाचे शिकणे यांचे काही नाते असते. चित्र आणि भाषिक कौशल्य यांचा संबंध असतो. अर्थात एकेकाळी मजकुराशी निगडित चित्र एवढ्या पुरता मर्यादित विचार केला जात होता. आता चित्रे हा शिकण्याच्या प्रक्रियेचा भाग आहे. चित्रे ही मुलांचे भावविश्व समृद्ध होण्याच्या दृष्टीने, शैक्षणिक विकासाबरोबर व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. त्यामुळे आपण किती प्रभावीपणे आणि कुशलतेने चित्रांचा उपयोग अध्यापनात करून घेतो, यावरही वाचन कौशल्यांचा विचार पुढे जात असतो.

मुलांना शाळेत येण्यापूर्वी काय आवडत असते? असा प्रश्न विचारला, तर त्याचे उत्तर प्रामुख्याने 'चित्रे' असे असते. अगदी लहान मुलाच्या हातात एखादे वर्तमानपत्राचे पान दिले, तरी ते हातात घेऊन त्याकडे पाहात असते. त्याला वर्तमानपत्रातील काहीच वाचता येत नसते, तरी मग ते हातात घेऊन काय वाचत असते? हा खरा प्रश्न आहे. आपण बालकांचे निरीक्षण केले, तर सहजतेने लक्षात येते, की बालक त्या पानावरील चित्र वाचत असते.

आपण जेव्हा वाचन कौशल्याचा विचार करतो, तेव्हा मुलांचा वाचन प्रवास हा चित्र वाचनापासूनच सुरू होत असतो. मुलांना आपण जी अक्षरे शिकवतो ती अक्षरे म्हणजे काय आहे बरे? कोणत्याही मुलांना जेव्हा वाचता येत नाही तेव्हा त्या मुलांसाठी अक्षरे ही एक प्रकारची चित्रेच असतात. आपल्याला ज्या भाषा येतात त्या भाषेतील अक्षरे वाचता येतात म्हणून आपण त्याला अक्षरे म्हणतो, समजा आपल्याला कन्नड, मल्याळम यांसारख्या भाषा वाचता येत नाहीत. त्यातील मजकूर आपल्या समोर ठेवला तर आपण त्या भाषेतील अक्षरे, शब्द जेव्हा पाहतो, तेव्हा ती अक्षरे एक प्रकारची चित्रेच असतात. मुलांसाठी आपल्या भाषेतील अक्षरे हीदेखील एक प्रकारची चित्रेच आहेत. त्यामुळे मुलांच्या वाचन प्रवासाची सुरुवात आपल्याला चित्रांपासूनच सुरू करण्याची गरज आहे. मुलांना चित्रे वाचायला द्यायला हवी. मुले जेव्हा चित्रांचे निरीक्षण करतात, तेव्हा त्यांतील सूक्ष्मतेचा प्रवास घडत असतो. त्यापासून सुरू झालेला प्रवास अक्षरांपर्यंत जाण्यास मदत करतो. निरीक्षणातून समोर येणारा सूक्ष्मभेद हळूहळू मुलांना प, फ, व, ब, क, ळ, ट, ढ, ठ यांसारख्या अक्षरांच्या मधील भेद लक्षात आणून देण्यास मदत करतो.

दूरदर्शनच्या विविध वाहिन्यांवर मुले विविध भाषांतील कार्टून्स पाहात असतात. व्हिडिओ गेम खेळण्यात तासन्‌तास घालवत असतात. त्यांना त्या पात्रांच्या संवादाची भाषा येत नाही, तरी ते काय पाहात असतात? असा प्रश्न पडतो. एखाद्या आशयात चित्र असले, की भाषेचा प्रश्न खूप कमी होतो हे लक्षात घ्यायला हवे. आपल्या मुलाच्या आयुष्यात खरेच चित्रांचे काय स्थान आहे? रंगरेषांमधून पुस्तकाच्या कोऱ्या पानांवर उमटलेली चित्रे पाहताना मुले अगदी हरखून जातात. पहिलीच्या वर्गात प्रवेशित मुले हाती पुस्तक घेऊन वाचण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा त्याचे खूप नवल वाटते. आपण त्यांच्याशी संवाद साधताना, 'तू काय करतो आहेस?' असे विचारले, तर त्याचे उत्तर असते पुस्तक वाचतो.' त्याच्या त्या बोलण्यात प्रचंड मोठा आत्मविश्वास सामावलेला असतो. काहीही वाचता न येणारी मुले या चित्रांच्या आधाराने पुस्तक वाचत असल्याचे दिसते. 'मला पुस्तक वाचता येते' ही भावना त्यांच्यासाठी खूप सुखद असते. त्यातून मुलांच्या मनात आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत होत असते. चित्रांशी मुलांचे एक नाते असते. त्या नात्यातून चित्रांना अर्थ देण्याचा प्रयत्न होत असतो. त्यातून मुलांची चित्रांबरोबर अधिक गट्टी होत असते. चित्रांशी मैत्री झाली, की मुले त्याच्याशी बोलू लागतात. त्यातून ते स्वतःचीच गोष्ट तयार करत असतात. मुले जेव्हा चित्रांसोबत बोलतात,

तेव्हा त्यात स्वतःच्या कल्पना जोडणे घडत असते. त्यांच्या पूर्वानुभवाचे ते उपयोजन असते. ही सवय मुलांना लागली, तर शिकणे जगण्याशी जोडण्याला मदत होत असते. मुले पुस्तकातील चित्रे जेव्हा पाहतात, तेव्हा त्याखालील मजकूर काय असेल याचा अंदाजही बांधण्यास शिकत असतात. चित्राच्या माध्यमातून मूल अधिक चांगल्या प्रकारे एखादी गोष्ट, माहिती, आशय, संकल्पना समजून घेऊ शकते. त्यामुळे चित्रे ही काही केवळ पहिली, दुसरीच्या मुलांसाठी हवी आहेत असे नाही, तर पुढील वर्गांच्या पुस्तकांतही हवीत. चित्रांमुळे मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळत असतो. वाचनाच्या पहिल्या टप्प्यावर चित्र, विविध वस्तू, व्यक्ती यांच्या प्रतिमा पाहून त्या मुलांच्या स्मरणात घर करतात. खरे तर मूल जेव्हा नवीन काही पाहात असते, तेव्हा त्यावर मूल विचार करत असते. त्याचा आकार, रंग, चव, रूप यांसारख्या विविध अंगांनी त्याची विचारप्रक्रिया सुरू असते. ती त्याच्या पूर्वअनुभवांशी त्या सर्व गोष्टींचा संबंध लावत असते. या मानसिक प्रक्रियेचा उपयोग शिकण्याच्या प्रक्रियेला हातभार लावण्यास होत असतो. त्यामुळेच मुलांच्या शिक्षणासाठी चित्र वाचनाचा प्रवास हा अधिक महत्त्वाचा ठरतो.

अगदी लहान वयात मूल जेव्हा चित्र पाहते, तेव्हा त्या चित्रांशी गप्पा मारत असते. मुलांना गप्पा मारायला खूपच आवडतात. गप्पा मारणे हे एक प्रकारचे अभिव्यक्त होणे असते. येथे मूल जेव्हा गप्पा मारत असते, तेव्हा ते पूर्वानुभव असतात किंवा मनातील कल्पना असतात. ही सर्जनाची वाट मुलांसाठी अधिक महत्त्वाची ठरते. अशा वाटा मिळत गेल्या, की मुले आपल्या कल्पनेच्या जोरावर गगनभरारी घेऊ लागतात. ही कल्पकता मुलांना भाषेची अभिरुची वाढविण्यास मदत करत असते. चित्रगप्पांचा उपक्रम वर्गात मुलांना अधिक अभिव्यक्त होण्यासाठी निश्चित मदत करणारा ठरतो. आपण आरंभ करताना मात्र अगदी छोट्या चित्रांपासून अर्थात एका चित्रापासून करायला हवी. हळूहळू मूल एक चित्र वाचत गेले, की मग नंतर दोन चित्रे, नंतर तीन चित्रे असा प्रवास वाढवायला हवा. नंतर अगदी गुंतागुंतीच्या चित्रापर्यंतही मूल वाचत जाते. चित्राविषयी मूल जेव्हा बोलते, तेव्हा त्याला अगदी मनसोक्त आणि हवे तितके बोलू दिले पाहिजे. त्यांचा चित्रांशी घडणारा संवाद म्हणजे स्वानुभवविश्वाशी जोडणे असते. चित्रवर्णन करता करता स्वतःच्या अनुभवांची भर त्यात घालत ते बोलत असतात. चित्रवाचनाचा विचार आपण शास्त्रीय अंगाने करण्याचा प्रयत्न केला, तर लक्षात येते, की त्यातून मुलांची निरीक्षणशक्ती वाढत असते. हे चित्रवाचन एक प्रकारे दृष्टी, बुद्धी, विचार आणि कल्पनाशक्तीला दिलेला व्यायामच आहे. यातून मुले भोवतालचा परिसर, माणसे, व्यवहार यांचे निरीक्षण करायला शिकतील. ढोबळ गोष्टींपासून लहान लहान बारकाव्यांपर्यंत अनेक बाबी जाणीवपूर्वक निरीक्षण करायला शिकतील.

चित्र या दृश्य माध्यमाकडे लक्षपूर्वक पाहायला शिकतील. त्यातील आशय व्यक्त करायला शिकतील. त्यांना काही सांगायचे आहे, तेव्हा ते विविध शब्दांचे उपयोजन करतील. त्यामुळे त्यांच्या शब्दसंपदेमध्ये निश्चित वाढ झालेली दिसेल. हळूहळू त्यांच्या निरीक्षणाच्या सवयीमुळे त्यांची आस्वाद क्षमता वाढीस लागेल. या गोष्टी घडत गेल्या, तर आपल्याला शिक्षणातून ज्या क्षमता विकसित करायच्या आहेत त्यासाठी निश्चित फायदा होईल.

एखादा विषय समजून घेण्यासाठी चित्र पुरेसे ठरते. चित्र हे एकहजार शब्दांचे काम करते असे म्हणतात. चित्रवाचन वयोगटाच्या विविध टप्प्यांवर कसे घ्यायचे हे मात्र आपण समजून घ्यायला हवे इतकेच. लहान मुलांना चित्र पाहायला, हाताळायला मिळाले पाहिजे. चित्र आवडले का? चित्रातील काय आवडले? चित्र कशाचे आहे? चित्रात काय काय दिसत आहे, अशा साध्या

साध्या प्रश्नांपासून या गप्पांना सुरुवात केली जाते. मूल व्याकरणाचा विचार न करता आपल्या प्रश्नाला अगदी सहजतेने प्रतिसाद देईल. मात्र हळूहळू इयत्ता उंचावत जाईल त्याप्रमाणे नाम, सर्वनाम, क्रियापदे, विशेषणे, क्रियाविशेषणे मुलांच्या बोलण्यात येतील त्यासाठी जाणीवपूर्वक प्रश्नांची रचना करावी लागते. त्यातून मुलांच्या भाषिक विकासाच्या प्रक्रियेला हातभार लागण्यास मदत होते. कोण काय करत आहे? काय दिसत आहे? कसे? केवढे? कोठे? असे विविधांगी प्रश्न विचारले, तर मुलांची निरीक्षणाची सवय आणखी दृढ होण्यास मदत होते. मुलांना स्वतःच्या अनुभवांबद्दल बोलते करण्यासाठी त्यांच्याशी गप्पा मारताना, ते जे काही सांगत असतात, त्यांच्या त्या अनुभवातील चित्र त्यांच्या हाती देऊन त्या चित्राबद्दल बोलते केले पाहिजे. जर ते एखाद्या लग्नाला गेले असतील, तर लग्नाचे चित्र दाखवणे, कोणासोबत गेला होता? कोणाचे लग्न होते? केव्हा गेला होतात? लग्नाला कोण कोण आले होते? लग्न कोठे होते? लग्नात काय पाहिले? जेवणासाठी कोणते पदार्थ होते? असे अनेक प्रश्न विचारता येतील. आरंभी मुलांना साधे साधे प्रश्न विचारून बोलते करावे. नंतर मुलांना आत्मविश्वास आला, की कल्पनाशक्तीला चालना देणारेही प्रश्न आपणाला विचारता येतील. जेव्हा आपण मुलांनी चित्रावर बोलावे म्हणून प्रश्न विचारतो, तेव्हा त्यात सहजता असायला हवी. अन्यथा चित्र वाचनाकडे घेऊन जाताना विचारलेल्या प्रश्नांमुळे तो तास प्रश्नोत्तरांचा होण्याची शक्यता अधिक असते. तसे होणार नाही याची काळजी शिक्षक म्हणून आपण घ्यायला हवी. चित्रवाचन म्हणजे केवळ पाहिलेल्या चित्रात काय काय दिसते, एवढे सांगणे नाही, तर त्या पलीकडचा विचार करता येणे महत्त्वाचे आहे. अंदाज बांधता येणे महत्त्वाचे आहे. तसे घडले तर वाचनासाठी त्याचा लाभ होत असतो.

पुढे चित्र पाहून उत्तम प्रतिसाद मिळू लागल्यावर काही दिवसांनंतर चित्राचे निरीक्षण केल्यावर ते बाजूला ठेवून त्यातील जास्तीतजास्त किती तपशील मुलांना सांगता येतो, त्या संदर्भाने त्याला प्रश्न विचारल्याने निरीक्षणाची सूक्ष्म सवय लागण्यास मदत होईल. चित्रातील एखादा प्रसंग निवडून गोष्ट तयार करणे, पात्रांना नावे देणे, अगदी पुढे जात त्याचे नाट्यीकरणही करणे शक्य आहे. चित्रासंबंधी, चित्रात न दिसणारे पण चित्र पाहून मनात येणारे शब्द जसे : नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद हे विचारता येईल. चित्रवाचनावरून एखादा उतारा लिहिणे, कथा तयार करणे, वर्णन, संवादलेखन, पत्रलेखन, कल्पनाविस्तार, वृत्तपत्रासाठी वार्तांकन अशा लेखनाच्या विविध प्रकारच्या लेखनासाठीदेखील आपल्याला अध्ययनअनुभव देता येईल.

आरंभी आपण काढलेली परिसरातील आणि मुलांच्या पूर्वानुभवाची चित्रेच हाती द्यावीत. आपल्या या विविध प्रकारच्या अध्ययन अनुभवांमुळे चिकित्सकपणे पाहण्याची दृष्टी विकसित होण्यास मदत होईल. चित्र वाचनाचा आरंभ हा चित्रवाचन, चित्रवर्णन आणि चित्रगप्पा अशा चढत्या आलेखाने करता येणे शक्य आहे. त्यादृष्टीने आपण प्रयत्न करण्याची गरज आहे. वर्गात अशी प्रक्रिया घडत गेली, की मुलांना बोलण्यासाठीच्या संधी शोधाव्या लागत नाहीत, त्या आपोआप मिळत जातात. चित्रवाचनाच्या प्रवासापासून मुलांच्या मनात आत्मविश्वास निर्माण होतो. त्यातून मुलांची वाचनाची भूक वाढत जाते. मुलांना बोलण्यासाठी लागणाऱ्या शब्दसंपदेचे महत्त्व अधिक वाटू लागते. त्याकरता मुलांना नवनवीन अनुभव हवे असतात. त्यातून मुलांना पुस्तक वाचनाची गरज निर्माण होत असते. मूल चित्र वाचताना जो विचार करायला शिकते, त्याचा उपयोग वाचताना दोन ओळीत दडलेला अर्थ जाणून घेण्यास मदत होत असते.

मुलांना चित्राबरोबर वाचन कौशल्याकडे घेऊन

जाण्यासाठी वाचून दाखवणेदेखील महत्त्वाचे असते. पुस्तके वाचून दाखवण्याचा काय फायदा असा प्रश्न केला जाऊ शकतो. तेव्हा त्याचे उत्तर केवळ आनंद मिळवणे एवढेच असते. पुस्तक वाचनाचे कौशल्य प्राप्त केलेले असेल, तर विद्यार्थ्यांना शिक्षकांनी वाचून दाखवलेले आवडते हे निश्चित. माणूस हा आनंदकेंद्री आहे. त्यामुळे ज्या ज्या गोष्टीत त्यांना आनंद वाटतो, त्या त्या गोष्टी करण्यात विद्यार्थी रमतात. त्या त्या गोष्टी पुन्हा पुन्हा केल्या जातात. पुस्तकातील गोष्टी आनंद देतात, असे जेव्हा मुलांना वाटते, तेव्हा मुले गोष्टी वाचनाकडे आकर्षित होत जातात. तेथूनच पुस्तकाकडे वाटचाल सुरू होते. मुलांचे भावविश्व अधिक व्यापक बनत जाते. डेव्हिड स्नोडान म्हणतात, की 'मुलांना लहानवयात वाचून दाखवणे हा मुलांची शब्दसंपदा आणि वाचताना दोन ओळींत दडलेला अर्थ जाणून घेण्याचा एकमेव मार्ग आहे.' मुलांना गोष्टी ऐकण्याची आणि त्यात आनंद मिळत असल्याची भावना दृढ झाली की, पुस्तकातील गोष्ट आपण वाचावी ही भावना विकसित होते. ही भावनाच मुलांच्या वाचनासाठीचा प्रवास करण्यास प्रेरक ठरते. हा प्रवास जेव्हा असा विविध टप्प्यांनी सुरू होतो, तेव्हा वाचन अधिक अर्थपूर्ण होण्यास मदत असते. वाचन करण्यात विचार करणे अंतर्भूत असते. आकलन महत्त्वाचे ठरते. आज आपण डिजिटल युगाची भाषा करत असलो, तरी त्याचा विपरीत परिणाम मुलांच्या शिक्षणावर होत आहे, हे समोर आले आहे. त्यामुळे डिजिटल युगातही वाचनासाठी पुस्तक हाती देणे महत्त्वाचे आहे. मुलांना वाचनाचा आनंद मिळेल या दृष्टीने प्रयत्न होणे नितांत गरजेचे आहे. वाचनाचा प्रवास पहिली ते सहावीच्या दरम्यान घडला, तरच भविष्यात वाचनाचा संस्कार दृढ होईल. त्यामुळे या स्तरावर वाचन संस्काराकडे अधिक गंभीरपणे पाहायला हवे.

■■■

**(पृष्ठ क्र. २५ वरून)**

### वाचाल तर वाचाल म्हणजे काय? :

मित्रांनो, हे जग फार स्पर्धेचे आहे. हल्ली तर जन्माला आल्यापासूनच पालक नानाविध प्रकारच्या स्पर्धांमध्ये आपल्या पाल्यांना उतरवत असतात. मग या स्पर्धेत जर आपल्याला टिकून राहायचे असेल तर आपल्याला आपले ज्ञान रोजच्या रोज अद्ययावत ठेवता आले पाहिजे. अशा अर्थाने आपण जर वाचत राहिलो, तर आपण या स्पर्धांमधून यशस्वीपणे तरून पुढे जातो. जीवनामध्ये यशस्वी व्हायचे असेल, तर आपण वाचनाची सवय लावून घेतलीच पाहिजे. दररोज मी दहा ओळी वाचल्याशिवाय झोपणार नाही, असा पण आपण आपल्या स्वतःशी केला पाहिजे.

### वृत्तपत्र का वाचावे?

वृत्तपत्रातील मजकूर विविध विषयांना धरून असतो. अगदी आंतरराष्ट्रीय स्तरापासून ते स्थानिक स्तरापर्यंतच्या बातम्या वृत्तपत्रांमध्ये असतात. वृत्तपत्रांत विज्ञान, अर्थ, क्रीडा आणि मनोरंजन, देश-विदेशातील घटना अशा विविध विषयांवर स्वतंत्रपणे सदरे असतात. कोडी असतात, बोधकथा असतात, सुविचार असतात, संतवाणी असते. छोट्या जाहिराती, मोठ्या जाहिराती असतात. जाहीर सूचना असतात, आणि अजून बरेच काही असते; म्हणून वृत्तपत्र आपण दररोज वाचलेच पाहिजे. डॉ ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्यासारखे ध्येय वेडे लोक आपले आदर्श असलेच पाहिजेत. डॉ. कलाम यांचा जन्मदिवस आपण 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करतो.

चला तर मग, पुस्तकाला आपला सच्चा मित्र बनवूया. हा एक असा मित्र आहे, जो आपल्याला कधीच चुकीची वाट दाखवत नाही. आपल्या मित्रमैत्रिणींच्या वाढदिवसाला आपण पुस्तके भेट देऊया. आपली वाचून झालेली पुस्तके आपण दान करूया. ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते हा विचार आचरणात आणूया.

■■■

# वाचनाची गोडी

**आश्लेषा महाजन**
सहकारनगर-१, पुणे ०९
भ्रमणध्वनी : ९८६०३८७१२३

*मातृभाषेचे संस्कार घरात आई, त्यानंतर शाळा आणि मग पुस्तकांतून होत असतात. पाठ्यपुस्तकांतून वाचनाचा संस्कार होतो. त्याची व्याप्ती वाढत ई-बुक तसेच अन्य भाषांमधील पुस्तकांचे वाचन घडते. वाचनसंस्कार व स्वानुभव यांविषयीचे चिंतन मांडणारा लेख.*

'वाचन' हा विषय समोर आला, की मला तीन प्रेरणास्रोतांची आठवण होते. सर्वप्रथम आठवते ती आई; जिने मातृभाषा माझ्या कानात आणि मुखात रुळवली. तीच मातृभाषा मला जिने वाचायला आणि लिहायला शिकवली ती शाळा-माउली आणि तिथले शिक्षक, मग आठवतात ती समोर येणारी हजारो पुस्तके आणि त्या पुस्तकांबरोबरचा माझा आजवरचा प्रवास. पुस्तकांनी माझे भाषाप्रेम जागते ठेवलेच. कुठलेही पुस्तक हातात आले, की या तिघांचे स्मरण होतेच. माझ्याच नव्हे, तर सगळ्या बोलक्या आणि वाचणाऱ्या माणसांच्या मुखात वाणी संक्रमित करणाऱ्या या तीन प्रेरणास्रोतांचा मला मागोवा घ्यावासा वाटतो.

माणसाला व्यक्त होण्यासाठी भाषेची आवश्यकता असते. कारण माणूस 'बोलका' प्राणी आहे. त्याने आपली संस्कृती निर्माण केली आहे. मूल आईच्या मांडीवर बसून रंग-रूप-गंध-स्पर्शासह तिच्या ध्वनीशी परिचित होते. तिला प्रतिसाद देते. नकळत ते मूल एक भाषा शिकत असते. देहबोली, हातवारे, हावभाव, स्पर्श, खुणा आणि ध्वनी यांची ती भाषा असते. पुढे मूल ऐकून, पाहून व्यवस्थित भाषा शिकते. शाळेत गेल्यावर वाचन आणि लेखन यांतून भाषा अधिक विकसित होते. याच वयात मुलांच्या हातात छोटेसे पुस्तक येते. चित्रमय पुस्तकातून 'वाचेचे वाचन' सुरू होते. वाणीला वळण लागते. लेखनातून, लिपीतून ती वाणी जतन केल्याचा आनंद मिळतो. मुलांना भाषेचा उपयोग आणि हेतू तर समजतोच आणि या शालेय काळात भाषेचे सौंदर्य हळूहळू उमजत जाते. या वयात ग्रहणशक्ती तीव्र असते. मातृभाषेचे संस्कार आत्मसात करण्याचा हा काळ. त्यामुळे पाठ्यपुस्तके हा वाचनसंस्कृतीचा पाया आहे, असे वाटते. जो समाज लहान मुलांसाठी उत्तम पुस्तके निर्माण करतो, तोच भाषेचे पाथेय कोवळ्या पिढ्यांच्या ओंजळीत देतो. मी बाल-कुमारांसाठीची पुस्तके आवर्जून वाचते. त्यांच्यासाठी अनुवाद करते, लिहिते.

मी बहुतांश मराठी पुस्तके वाचते. मराठी वाचनात मी रमते, त्यात मला आनंद मिळतो. शतकांचा प्रवास करून आलेली, आंदण मिळालेली मराठी ही आपली, महाराष्ट्रातील लोकांची भाषा. जगभरात ज्या ज्या ठिकाणी मराठी माणूस पोहोचला आहे, तिथे त्याची भाषाही पोहोचली आहे. कुठलेही मराठी पुस्तक वाचताना ही अभिमानाची, कृतज्ञतेची जाणीव मनात खोलवर असते. मायबोलीला संत ज्ञानेश्वरपूर्व काळातील मुक्तेश्वर आणि त्यांच्याही आधीच्या अनेक संदर्भांचे लिखित व शिलालेखीय पुरावे आहेत. अगदी काही प्राचीन संस्कृत नाटकांतही काही पात्रे मराठी

किंवा महाराष्ट्री ही प्राकृत भाषा बोलतात. प्राकृत म्हणजे प्रकृतीपासून निर्माण झालेली, नैसर्गिक. म्हणजेच या मातीतली, इथल्या परंपरा–संस्कृतीचा सुगंध असलेली! अशी दीर्घ परंपरेची धरोहर असलेली भाषा ज्या देखण्या देवनागरी लिपीत मांडलेली आहे, असे पुस्तक वाचताना मराठी भाषेविषयीची माझी कविता मला आठवते –

*अमृतापरी गोड आणखी सुंदर आमुची भाषा*
*ओठांवरती तिचीच रूपे, भरूनी अवकाशा...।।ध्रु।।*
*मातीच्या गंधातून यावी लहर कोवळी ओली*
*श्वासांमधुनी सहजी विहरे तशीच आमुची बोली*
*टपोर मोत्यापरी लिपी अन् अक्षर अक्षर रेषा...*
*अमृतापरी गोड आणखी सुंदर आमुची भाषा... ।।१।।*
*संत, पंत अन् तंत वाङ्मयामधून सजली वाणी*
*कथा–व्यथा अन् लालित्याने भावभारली गाणी*
*कोशामधल्या शब्दार्थांना अभिव्यक्तीची आशा...*
*अमृतापरी गोड आणखी सुंदर आमुची भाषा...।।२।।*
*भाषेचा हा उत्सव करतो जागर मानव्याचा*
*मना–मनांचा प्रवास घडवी सेतू संवादाचा*
*चिरंजीव हो मायमराठी हीच कामना–कांक्षा...*
*अमृतापरी गोड आणखी सुंदर आमुची भाषा..*

पुस्तकांत, मासिकांत, नियतकालिकांत, वृत्तपत्रांत, ई–बुक्समध्ये आणि विविध समाजमाध्यमांवर येणारी अक्षरे वाचताना भाषेच्या विकासाचा चित्रमेळा एक कोलाज सतत पार्श्वभूमीवर तरळत असतो. कवितासंग्रह, कथासंग्रह, लेखसंग्रह, वैचारिक पुस्तके, ललित पुस्तके, कादंबरी, संशोधनपर पुस्तके, कोश, संकलित माहितीपर पुस्तके, संपादने, अनुवाद, नाटके, बालकुमार साहित्य असे नानाविध साहित्यप्रकार वाचतानाही तो भाषेच्या विकासाचा चित्रमेळा (कोलाज) असतोच आरशामागच्या पाऱ्यासारखा.

एखादी भाषा विकसित होते, म्हणजे काय काय होते? ती प्रदीर्घ काळापासून जनमानसाच्या मुखातून प्रवाहित होते. भाषा दीर्घकालीन सांस्कृतिक घुसळणीतून हळूहळू साकार होते. भाषा म्हणजे संस्कृतीचे संचित. दीर्घ मंथनातून हळूहळू ती सर्वतोमुखी होते, सार्वत्रिक होते. तिला बहुसंख्याकाकडून मानांकन मिळते! मग ती रूढ होते. ती लवचीक असल्याने तिच्यात बदल होतात, ती कूस बदलते, तिच्यात तत्सम, तद्भव, पारिभाषिक शब्दांची भर पडते. त्यानंतर त्या भाषेला पकडून ठेवण्यासाठी तिला चित्रांकित करणारी लिपी विकसित होते. लिपीतही दीर्घ काळपर्यंत अनेक वळण–वाकणांचे प्रवाह येत राहतात. काळाच्या एका टप्प्यावर लिपीला मान्यता मिळते, मग तीही सार्वत्रिक होते. मग लिहिले किंवा लादले जाते व्याकरण! त्यामुळे भाषेला आणि लिपीला शिस्त येते. भाषा बंदिस्त होते. तिला नियमांची चौकट मिळते. पुस्तक वाचताना एखादे संतवचन येते. मग मन त्या त्या शतकातल्या भाषेकडे धाव घेते. एखादा संस्कृत किंवा भारतीय भाषाभगिनीचा शब्द येतो किंवा क्रियापद येते. मग मन त्या त्या संदर्भांकडे वळते. व्युत्पत्ती किंवा शब्द कसा तयार झाला, याचे उत्खनन करावेसे वाटते. हे सारे एखाद्या चित्रपटासारखे किंवा स्वप्नदृश्यासारखे समोर दिसत राहते. मुखपृष्ठ, अर्पणपत्रिका, प्रस्तावना, प्रत्यक्ष लेखन ते पाठराखण करणारे शब्द (ब्लर्ब) वाचत असतानाच कागद, छपाई, मांडणी, सजावट इत्यादी गोष्टींतून 'पुस्तक अनुभवणे' होत राहते. पुस्तक म्हणजे केवळ शब्दांचा साठा नसते. पुस्तके तुकड्यातुकड्यांनी विश्वरूपदर्शन घडवतात.

भाषेच्या विकासाच्या विविध टप्प्यांवर माणसाने त्या वाहत्या वाणीला कसे बंदिस्त केले, कसे ग्रथित केले, हा विचार मला पुस्तक वाचताना अचंबित करतो. माणसाने कधी शिलालेखांतून, कधी भूर्जपत्रांवर, ताडपत्रांवर, सांचिपटावर किंवा पपायरस आणि कागदावर शब्द मुद्रित केले. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात साधारणतः आज

आपण जो कागद वापरतो, त्या कागदाचे पूर्वरूप चीनने साकार केले, तर जर्मनीतील योहान गुटेनबर्गने १४३४ पासून अनेक प्रयोग करत करत पुढील काही वर्षांत ४० पानांचे बायबल छापले. हे कागद बांधणीचे जगातील पहिले मुद्रित पुस्तक. भारतामध्ये गोव्यात १५५६ मध्ये छपाईयंत्र पोहोचले. ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी पोर्तुगीजांनी या काळात गोव्यात मुद्रणालये उभारली. भारतावर कब्जा मिळाल्यावर ईस्ट इंडिया कंपनीने कोलकात्याला छापखाने टाकले. त्यानंतरचा सुमारे २०० वर्षांचा इतिहास म्हणजेच आपल्या देशातील पुस्तकांचा आणि अर्वाचीन वाचन-संस्कृतीचा ढोबळ इतिहास.

मुद्रणकला ही गद्य लेखनाची जननी आहे, असे अभ्यासक म्हणतात, कारण मुद्रणकलेचा विकास होण्यापूर्वी बहुतकरून पद्यात लेखन करून ते पाठ करून श्रुतींमध्ये जतन करण्याची परंपरा होती. भूर्जपत्रादी साधनांवर लेखकांनी ग्रंथ नक्कल करून ठेवणे हे काही सोपे काम नव्हते. शिवाय या नकला मोजक्या आणि दुर्मीळ असल्याने पाठांतराला, मौखिक परंपरेला पर्याय नव्हता. देवी सरस्वतीविषयक श्लोकात 'वीणापुस्तकधारिणी' असा तिचा उल्लेख असला तरी त्या काळी पुस्तक दुर्लभच होते. त्यातच ते मूर्खांच्या हातात पडले तर मग कल्याणच! सुभाषितकारांचे पुस्तकच साक्षात सांगते-

*तैलात् रक्षेत्, जलात् रक्षेत्, रक्षेत शिथिलबंधनात्।*
*मूर्खहस्ते न दातव्यं एवं वदति पुस्तकम्।।*

पुस्तक वाचताना असे सारे मनात रुंजी घालत असते. भाषेचे संचित आपल्या हाती आहे, अशा पवित्र भावना मनात गर्दी करून असतात. आपण छोट्याशा आयुष्यात आपल्या परीने वाचन-लेखन-बोलीतून त्या प्रदीर्घ भाषिक परंपरेचे वहन करत आहोत, ही कृतज्ञ जाणीव असते. जाणीव आणि नेणीवांचेही अन्वय लावू पाहणाऱ्या पुस्तकांविषयी माझी एक रचना आहे. पुण्यातील 'विद्यावाणी' रेडिओसाठी लिहिलेले हे बोलगाण्यासारखे शीर्षकगीत आहे.

**पुस्तक पुस्तक**

*पुस्तक पुस्तक याचे त्याचे पुस्तक*
*जाणिवांचे नेणिवांचे शब्द अन्वयार्थक ।।ध्रु।।*
*कथा, कादंबरी, लेख, कवितांचा शोधऽ*
*मनातल्या कल्लोळाचा, भावनांचा बोधऽ*
*विश्वरूप दर्शनाने भणाणते मस्तक ।।१।।*
*पुस्तकांच्या गोष्टी साऱ्या, गोष्टींची पुस्तके*
*काळजाचे ठोके, कधी उंच उंच झोके*
*समाजाचे आरसे हे, माणसांचे दस्तक ।।२।।*
*पुस्तकांच्या अरण्यात प्रतिभेची कुपी*
*पानोपानी उजळते अक्षरांची लिपी*
*पुस्तकांच्या चकव्यामध्ये गवसते सार्थक ।।३।।*

संगणकाच्या मदतीने होणारी आधुनिक पुस्तके आज आपण हाताळतो. मुद्रणकला आता खूप सोपी झाली आहे. शिक्षणाचे लोकशाहीकरण झाल्यानंतर अभिव्यक्तीचेही लोकशाहीकरण झालेले आहे. पुस्तकांचा महापूर येतो आहे. त्यातून माझ्या वाचनाचे विविध कप्पे तयार झालेले आहेत. खूप सारी पुस्तके मला वाचायचीच असतात, म्हणून ती आवर्जून विकत आणली जातात आणि वाचलीही जातात. काही पुस्तके पुस्तकप्रेमी मित्रमैत्रिणींच्या 'वाचलीच पाहिजेत' अशा शिफारशींनी घरात प्रवेश करतात आणि वाचली जातात. चांगले लेखन वाचले जावे, हे तर झालेच, पण वाईट किंवा सुमार लेखन कसे असते, हे कळण्यासाठीही काही पुस्तके वाचली जातात. अशी बेताची पुस्तकेही काहीबाही शिकवतातच. खूप सारी पुस्तके मला भेट मिळतात. त्यात कवितासंग्रह अधिक संख्येने असतात. त्याशिवाय कथासंग्रह, कादंबरी, वैचारिक, संशोधनपर, अनुवाद इत्यादीही असतात. कामांच्यामध्ये अवकाश

मिळाला, की अशा पुस्तकांचा आस्वाद घेता येतो. ग्रंथालयातून पुस्तके आणून वाचणे नि ती वेळेत परत करणे ही गोष्ट वाचनाला शिस्त लावते; पूर्वी हे होत असे. पण हल्ली ती जिकीर वाटते. त्यामुळे हवे ते पुस्तक मिळवणे, विकत घेणे नि वाचणे, हेच ठीक वाटते. माझ्या व्यावसायिक लेखनाचा भाग म्हणून काही पुस्तके समोर येऊन ठाकतात. माझ्या स्वतःच्या लेखनासाठी मला अनेक संदर्भग्रंथ वाचायचे असतात. त्या संदर्भग्रंथांचा, कोशांचा सहवास समृद्ध करणारा ठरतो. वृत्तपत्रांच्या रविवार पुरवण्या तसेच नियतकालिके यांच्यासाठी पुस्तक परीक्षणे लिहिणे (समीक्षा हा मोठा शब्द आहे) हेही एकूणच पुस्तक जगतातले महत्त्वाचे काम आहे, असे मी मानते. अशी परीक्षणार्थ आलेली पुस्तके शिस्तीत आणि डेडलाईनच्या मर्यादित काळात वाचून होतात. पुस्तक वाचताना पेन्सिलने बारीकशा खुणा, टिपण करण्याची माझी पद्धत आहे. पुस्तकाचे पुनर्वाचन करताना त्या मागच्या खुणा ठरतात. पुनर्वाचन हाही एक समृद्ध करणारा प्रवास असतो. कधी कधी पुनर्वाचन वेगळी दृष्टी देते. कधी रटाळ वाटते, कधी मात्र ते पूर्वग्रह पुसून टाकते. याशिवाय मासिके, नियतकालिके आणि दिवाळी अंक ज्यात माझे लेखन असते म्हणून आणि मी आवर्जून विकत घेते म्हणूनही घरी येतात. हे मी वेगळे काहीच सांगत नाही. कुठल्याही लेखकाच्या घरी दिसते, तेच किंवा तशाच पद्धतीचे चित्र मी शब्दबद्ध केले आहे. विषय वाचन संस्कृती हा असल्याने हे सांगणे क्रमप्राप्त आहे.

आज वाचनाच्या परि आणि मिती बदलल्या आहेत. ई-बुक, ऑडिओ बुक, अभिवाचन, पुस्तकांचे माध्यमांतर, समाजमाध्यमांवरचे वाचन असे बहुविध प्रकार समोर आलेले आहेत. पुस्तक हातात घेऊन वाचण्याचे प्रमाण घटत आहे, पण समाजमाध्यमांवरच्या पडद्यावरचे वाचन आणि 'पाहणे व ऐकणे' वाढलेले आहे. हातात लेखणी घेऊन वहीत लिहिणेही कमी कमी होत आहे. नाटक, चित्रपट, मालिका, वेब सिरीज व अन्य दृक्श्राव्य माध्यमांतून भाषा प्रवास करते. शाळा, पुस्तक, वही या पारंपरिक गोष्टींसह विविध कृती, अनुभव, प्रवास, श्रवण, बघणे इत्यादी गोष्टींनीही विकसित होता येते. काळाच्या सुरकुत्यांमध्ये काही लुप्त होते, तर काही उसळून वर येते. काही भूमिगत होते, तर काहींचा उत्खननातून जीर्णोद्धार होतो. जे सघन व समृद्ध, ते टिकते. हे कालगतीचे चक्र आहे. सुमारे २०० वर्षांचा इतिहास असलेल्या देशी मुद्रण व्यवसायातून जन्माला आलेल्या कागदी पुस्तकांचे स्वरूप आज पडद्यांवर उमटते आहे. मी या सगळ्या परिवर्तनांकडे स्वागतशील दृष्टीने पाहात असतानाच, कागदी पुस्तकप्रेमाचा जागर करणेही एकीकडे चालूच ठेवते आहे.

इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, जपानी, रशियन इत्यादी भाषा शिकून त्यातही वाचन, लेखन, अनुवाद असंख्य लोक करतात. विदेशी जाण्याच्या संधीही त्यात असतात. वाचनाचा पसारा विश्वव्यापी होत आहे. त्यांचे काही फायदे, काही तोटे आहेत. फायदे सर्वश्रुत आहेत. तोटे असे, की पिढी मातृभाषेपासून, इथल्या संस्कृतीपासून दूर जात आहे. जागतिकीकरणात विश्व हे एक खेडे झाले आहे. तिथे राहायचे, तर त्या त्या खेड्याची भाषा यायला हवी. अन्यथा आपण कालबाह्य ठरू अशी भीती निर्माण झाली आहे. काही प्रमाणात ते खरे असले, तरी त्यासाठी मातृभाषेला आचार, विचार, उच्चारातून हद्दपार करण्याची आवश्यकता नाही. हे बाल-कुमार-तरुणांना समजावून सांगण्यासाठी त्यांच्या भावविश्वात शिरायचा मी प्रयत्न करते. नव्या काळाची आव्हाने, ताण, अग्रक्रम समजून घेत बाल-कुमारांची पुस्तके आणि मासिके मी आवर्जून वाचते. त्यांच्यासाठी मी मराठी पुस्तके लिहिते.

**(पृष्ठ क्र. ३८ वर)**

# वाचनातून जिज्ञासू वृत्ती

**दिलीप देशपांडे चारठाणकर**
जि. प. प्राथ. शाळा, करडगाव,
ता. जि., परभणी
भ्रमणध्वनी : ९१३०६५८४३०

ऐतिहासिक संदर्भ, सामाजिक बदल आणि विकसित होणाऱ्या दृष्टिकोनांमध्ये अंतर्दृष्टी मिळविण्यासाठी विविध युगे आणि कालखंडातील साहित्यात जा. भूतकाळातील पुस्तकांचे वाचन केल्याने काळानुसार कल्पना कशा बदलत गेल्या आहेत याबद्दल उत्सुकता निर्माण होऊ शकते आणि आपल्याला वेगवेगळ्या कालखंडात संबंध जोडण्यास मदत होते. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ; जसे की प्राध्यापक, विद्वान किंवा व्यावसायिक यांच्याकडून पुस्तकांच्या शिफारशी घ्या. या शिफारशींमुळे तुमची समज वाढवणाऱ्या आणि विशिष्ट विषयांमध्ये कुतूहल वाढवणाऱ्या सुप्रसिद्ध आणि अभ्यासपूर्ण पुस्तकांशी तुमची ओळख होऊ शकते. तुम्ही वाचलेल्या पुस्तकांशी संबंधित साहित्यिक टीका आणि विश्लेषण एक्सप्लोर करा. भिन्न दृष्टिकोन आणि अर्थ प्राप्त करण्यासाठी अभ्यासपूर्ण लेख, गंभीर निबंध किंवा पुस्तक पुनरावलोकनाचा अभ्यास करा. गंभीर विश्लेषणामध्ये गुंतल्याने पुस्तकाबद्दलची तुमची समज वाढू शकते आणि पुढील अन्वेषणास प्रेरणा मिळते. विशिष्ट थीम, लेखक किंवा प्रदेश एक्सप्लोर करण्यासाठी वैयक्तिक वाचन आव्हाने सेट करा. उदा., तुम्ही प्रत्येक खंडातील पुस्तक वाचण्यासाठी किंवा नोबेल पारितोषिक विजेत्या लेखकांच्या कृतींचा शोध घेण्यास आव्हान देऊ शकता. ही आव्हाने तुमच्या वाचनाला रचना आणि उद्देश देतात, जिज्ञासा वाढवतात आणि विविध शोधांना प्रोत्साहन देतात.

> *प्रत्यक्ष पुस्तक वाचनाबरोबरच, अन्य माध्यमांतून आणि अभासी वाचनातून अनेक गोष्टी कळतात. त्यासाठी वाचनाची दिनचर्या पाळणे, अन्य लेखकांशी संवाद साधणे, वाचनतंत्रातील नवनवीन गोष्टींचा वापर करणे यांबाबत मार्गदर्शन करणारा लेख.*

लेखकांच्या वेबसाईट्स, ब्लॉग्स किंवा सोशल मीडिया प्रोफाइल्सची त्यांच्या प्रेरणा, लेखन प्रक्रिया आणि आगामी प्रकल्पांबद्दल अंतर्दृष्टी मिळवण्यासाठी एक्सप्लोर करा. लेखकांशी थेट गुंतून राहिल्याने तुमचा त्यांच्या कामांशी संबंध वाढू शकतो आणि त्यांच्या सर्जनशील प्रवासाबद्दल उत्सुकता वाढू शकते.

आभासी लेखक कार्यक्रम आणि पुस्तक चर्चांचा लाभ घ्या. अनेक लेखक ऑनलाईन मुलाखती, वेबिनार किंवा थेट वाचन करतात. या कार्यक्रमांमध्ये भाग घेतल्याने लेखकांशी संवाद साधण्याची, प्रश्न विचारण्याची आणि त्यांच्या पुस्तकांबद्दल सखोल माहिती मिळवण्याची संधी मिळते. एखादे पुस्तक पूर्ण केल्यानंतर, तुम्ही जे वाचले आहे त्यावर विचार करण्यासाठी वेळ काढा.

तुमच्या विचारांवर, भावनांवर किंवा दृष्टिकोनांवर त्याचा काय परिणाम झाला याचा विचार करा. चिंतनशील वाचन, आत्मशोध, आपल्या स्वतःच्या आवडी आणि मूल्यांबद्दल समजून घेण्यास प्रोत्साहन देऊन उत्सुकता वाढवू शकता. मित्र, सहकारी किंवा

समविचारी व्यक्तींसह वाचनगट तयार करा. पुस्तकांवर चर्चा करण्यासाठी, शिफारसी शेअर करण्यासाठी आणि अर्थपूर्ण संभाषणांमध्ये व्यस्त राहण्यासाठी नियमितपणे भेटा. एक सहायक वाचन समुदाय विविध दृष्टिकोन प्रदान करू शकतो, कुतूहल वाढवू शकतो आणि बौद्धिक शोधासाठी जागा तयार करू शकतो. वाचनाची आव्हाने आणि ॲप्स एक्सप्लोर करा; जे वैविध्यपूर्ण वाचनाला प्रोत्साहन देतात, तुमच्या प्रगतीचा मागोवा घेतात आणि तुमच्या स्वारस्यांवर आधारित शिफारसी देतात. ही साधने तुम्हांला नवीन पुस्तके शोधण्यात, उद्दिष्टे निश्चित करण्यात आणि सातत्यपूर्ण वाचन सराव राखण्यात मदत करू शकतात.

लक्षात ठेवा, वाचनाद्वारे जिज्ञासू मानसिकता विकसित करणे हा एक वैयक्तिक प्रवास आहे. साहित्याच्या विविधतेचा स्वीकार करा, सामग्रीमध्ये सक्रियपणे व्यस्त रहा आणि तुमच्या जिज्ञासेला तुमच्या शोधाचे मार्गदर्शन करू द्या. शोध प्रक्रियेचा आनंद घ्या आणि आपण पुस्तकांच्या आकर्षक जगात प्रवेश करत असताना मन मोकळे ठेवा.

वाचनातून जिज्ञासू वृत्ती निर्माण होण्यासाठी काही महत्त्वाच्या गोष्टी अंगीकारणे आवश्यक आहे.

**(१) वाचन दिनचर्या सांभाळा :** दररोज किंवा नियमितपणे वाचनासाठी समर्पित वेळ बाजूला ठेवा. तुमची जिज्ञासा वाढवण्यासाठी आणि वाचनाची सवय लावण्यासाठी सातत्य ही गुरुकिल्ली आहे. सकाळी काही मिनिटे असो किंवा झोपण्यापूर्वी एक तास, तुमच्या दैनंदिन वेळापत्रकात वाचनाला प्राधान्य द्या.

**(२) लायब्ररी आणि पुस्तकांच्या दुकानांना भेट द्या :** पुस्तकांच्या दुकानांना भेट देऊन स्वतःला पुस्तकांनी वेढून घ्या. शेल्फचे अवरूप ब्राउझ करा, विविध विभाग एक्सप्लोर करा आणि तुमचे लक्ष वेधून घेणाऱ्या पुस्तकांकडे स्वतःला आकर्षित होऊ द्या. पुस्तकांची भौतिक उपस्थिती कुतूहलाला प्रेरणा देऊ शकते आणि उत्साह आणि शोधाची भावना निर्माण करू शकते.

**(३) विविध माध्यमे एक्सप्लोर करा :** पारंपरिक मुद्रित पुस्तकांव्यतिरिक्त, ई–पुस्तके, ऑडिओ बुक्स किंवा अगदी परस्पर कथाकथन ॲप्स सारखी इतर माध्यमे एक्सप्लोर करा. प्रत्येक माध्यम एक अनोखा वाचन अनुभव देते, जे तुमची सामग्रीशी संलग्नता वाढवू शकते आणि वेगवेगळ्या प्रकारे उत्सुकता वाढवू शकते.

**(४) शैली आणि कालखंडात वाचा :** काल्पनिक ते नॉन–फिक्शन, क्लासिक ते समकालीन कार्यांपर्यंत वेगवेगळ्या शैलींमध्ये प्रवेश करा. विविध शैली आणि कालखंड एक्सप्लोर करून, तुम्हाला वेगवेगळ्या लेखनशैली, थीम आणि दृष्टिकोनांचा सामना करावा लागेल, जगाबद्दल आणि त्याच्या विविध कथांबद्दल व्यापक कुतूहल निर्माण होईल.

**(५) पूरक सामग्रीसह व्यस्त रहा :**

तुम्ही वाचत असलेल्या पुस्तकांशी संबंधित अतिरिक्त संसाधने शोधा. यामध्ये लेखकांच्या मुलाखती, पुस्तकांचे परीक्षण, अभ्यासपूर्ण लेख किंवा पुस्तकांवर आधारित माहितीपट आणि चित्रपटांचा समावेश असू शकतो. ही पूरक सामग्री संदर्भ, विश्लेषण आणि पुढील अंतर्दृष्टी प्रदान करू शकते, ज्यामुळे तुमची उत्सुकता वाढेल आणि तुमची समज वाढेल.

**(६) वाचन आव्हाने किंवा पुस्तक क्लबमध्ये सामील व्हा :** वाचन आव्हानांमध्ये सहभागी व्हा किंवा पुस्तक क्लबमध्ये सामील व्हा जेथे तुम्ही समविचारी

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

व्यक्तींसोबत पुस्तकांवर चर्चा करू शकता. हे समुदाय शिफारसी सामायिक करण्यासाठी, विचारांची देवाणघेवाण आणि व्याख्या आणि नवीन पुस्तके आणि दृष्टिकोन शोधण्याच्या संधी देतात. अशा चर्चांमध्ये गुंतल्याने कुतूहल आणि बौद्धिक अन्वेषणाची भावना वाढू शकते.

**(७) लेखकाच्या भूमिकेमध्ये प्रवेश करा :** ज्या लेखकांच्या कामांचा तुम्हांला आनंद वाटतो त्यांची पार्श्वभूमी, प्रभाव आणि प्रेरणा एक्सप्लोर करा. लेखकांची चरित्रे, मुलाखती किंवा निबंध वाचा आणि त्यांच्या सर्जनशील प्रक्रियेबद्दल माहिती मिळवा. पुस्तके कोणत्या संदर्भात लिहिली गेली हे समजून घेतल्याने लेखकांच्या कार्याबद्दल तुमचे कौतुक आणि उत्सुकता वाढू शकते.

**(८) विश्रांती घ्या आणि प्रतिबिंबित करा :** तुम्ही जे वाचले आहे त्यावर विचार करण्यासाठी स्वतःला वेळ द्या. तुमच्या प्रतिध्वनी असलेल्या कल्पना, संकल्पना किंवा थीमवर विचार करण्यासाठी पुस्तकांमध्ये विश्रांती घ्या. चिंतन आणि चिंत हे नवीन प्रश्न आणि कुतूहलाचे मार्ग निर्माण करू शकतात, ज्यामुळे तुम्हाला अधिक ज्ञान आणि समज मिळवता येते.

लक्षात ठेवा, जिज्ञासा ही एक मानसिकता आहे जी कालांतराने जोपासली जाऊ शकते आणि विकसित केली जाऊ शकते. तुमच्या वाचनाच्या सवयींमध्ये या धोरणांचा समावेश करून, तुम्ही जिज्ञासू वृत्ती जोपासणे सुरू ठेवू शकता आणि पुस्तकांद्वारे शोध आणि शिकण्याच्या आयुष्यभराच्या प्रवासाला सुरुवात करू शकता.

■■■

**(पृष्ठ क्र. ३५ वरून)**

एकंदर, पुस्तक आणि पुस्तकांच्या पसाऱ्यात मी हरवलेली असते. वाचनाचे व्यसनच जडले आहे म्हणा ना!

*वाचनाचे व्यसन ऐसे*
*त्यात वाचा वाचवावी*
*वाचल्यावर वेचलेले*
*वंचितांना ऐकवावे*

*शब्द केवळ शब्द नाही*
*काळगुंफेचे दुवे ते*
*शब्दकोशातील अर्था*
*जीवनाचे भान यावे*

*पुस्तके हातांत उघडी*
*आणि पडदेही सरकते*
*उत्सुका वाणी प्रवाही*
*अंतराळातून धावे*

*रंगरेषांची समाधी*
*सूरतालाची तपस्या*
*नेणत्या लालित्यरूपे*
*शारदेला त्या पहावे*

*ज्यांत प्रतिमांचीच बिंबे*
*येई सृष्टीला लकाकी*
*रोकड्या जगण्यामधेही*
*रसिकतेला मेळवावे*

*बोलक्या या मानवांनी*
*निर्मिली संवादबोली*
*जी लिपीने घट्ट धरली*
*तीस ओठी खेळवावे*

■■■

# वाचनकौशल्य शिकूया

**डॉ. दत्तात्रेय तापकीर**
वरिष्ठ अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सोलापूर.
भ्रमणध्वनी : ९९६०८४३१२७

*वाचन प्रक्रिया ही अनेक क्रियांचे मिश्रण आहे. चिन्हांकित लिपीचे आकलन होण्यासाठी अनेक क्रिया घडत असतात. वाचनकौशल्याची वैशिष्ट्ये, त्यांच्या क्षमता आणि वाचनकौशल्य विकसित होत असतानाचे विविध टप्पे या सर्वांचा आढावा घेणारा अभ्यासपूर्ण लेख.*

भाषा हे मानवाला मिळालेले अत्यंत महत्त्वाचे वरदान आहे. त्या पाठोपाठ भाषेची लिपी हे पण खूप महत्त्वाचे वरदान आहे. त्या नंतर एका मागोमाग एक अशी वरदानांची मालिकाच लागली. लिपीमुळे लिहिण्याची कला आली आणि लिहिलेले वाचण्यासाठी वाचनाची कला आली. मूळच्या श्रवण आणि संभाषण या कौशल्यांच्या आधारे अभिव्यक्त होणारी भाषा कालांतराने वाचन व लेखन या आणखी प्रगत व आकर्षक कौशल्यांचा साज मिरवू लागली, म्हणून सध्या जगातील सर्व विकसित भाषांचा पसारा आता श्रवण, संभाषण, वाचन व लेखन या चार मूलभूत कौशल्यांवर दिमाखाने उभा आहे.

श्रवण व संभाषण ही जशी परस्परावलंबी कौशल्य जोडी आहे तशीच वाचन व लेखन ही देखील परस्परावलंबी कौशल्यजोडी आहे. जसे ऐकायचे असेल, तर कोणी तरी बोलले पाहिजे आणि बोलले तर कोणीतरी ऐकायला पाहिजे, तसेच वाचायचे असेल तर कोणीतरी लिहिले पाहिजे; कारण कोणी लिहिलेच नाही तर मग वाचणार काय? आणि लिहायचे असेल, तर ते वाचणारा कोणीतरी पाहिजे, नाहीतर मग लिहायचे कशासाठी आणि कोणासाठी?

माझ्या या पूर्वीच्या लेखात म्हटल्याप्रमाणे वाचन ही अत्यंत सुंदर; पण गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. ती कलाही आहे, शास्त्रही आहे. वाचनप्रक्रिया ही अनेक प्रकारच्या क्रियांचे मिश्रण आहे. ती शारीरिक आणि मानसिक दुहेरी क्रिया आहे; ज्यामध्ये डोळे, हात, मेंदू, भावना, विचार सर्व समाविष्ट होतात. या सर्व गोष्टी वाचन शिकताना व शिकवताना लक्षात घ्याव्या लागतात.

वाचन ही मूलतः दृष्टिसाध्य कला आहे, त्यामध्ये पाहणे ही क्रिया अंतर्भूत आहे, त्यामुळे डोळ्यांचे काम खूप महत्त्वाचे आहे. अर्थात दृष्टिहीन व्यक्तींसाठी डोळ्यांनी वाचन करणे शक्य नसल्याने त्यांच्याकरता बोटांच्या स्पर्शाने वाचण्यासाठी ब्रेल लिपीची व्यवस्था असते. हा अपवाद आपण येथे विचारात घेत नाही, त्यामुळे आपणा सर्वांसाठी वाचन म्हणजे मूलतः पाहणे होय. काय पाहणे? तर लिहिलेले किंवा छापलेले किंवा स्क्रीनवर टाईप केलेले पाहणे होय; म्हणजेच काय पाहणे? तर वाक्ये, शब्द, अक्षरे पाहणे, म्हणजेच लिपी अथवा अक्षरचिन्हे पाहणे होय. चिन्हे म्हणजे काय? तर एक प्रकारच्या खाणाखुणाच होत त्या. उभ्या रेघा, आडव्या रेघा, तिरप्या रेघा, गोल, अर्धगोल, ठिपके आणि असे बरेच काही; जणू काही छोटी छोटी चित्रेच ती!

आपण मराठी वाचनाचा विचार करू. आपली वर्णमाला, वर्णाक्षरे, त्यातील अक्षरांची वळणे, त्यांचे आकार, त्यातील काना, मात्रा, वेलांट्या, उकार, रफार, अनुस्वार इत्यादी कितीतरी मंडळी लेखणीतून कागदावर उतरत असतात; म्हणजेच लिहिणारा

ती उतरवत असतो. ही सगळी चिन्हांकित मंडळी पाहायची आणि ओळखायची म्हणजे वाचन होय. ही सर्व मंडळी पाहायला आणि ओळखायला शिकणे म्हणजे वाचायला शिकणे होय. तसेच ही मंडळी पाहायला आणि ओळखायला शिकवणे म्हणजे वाचायला शिकवणे होय.

वाचन म्हणजे चिन्हांनी उर्फ वर्णाक्षरांच्या समूहांनी बनलेले शब्द पाहणे, ते ओळखणे व त्यांचा अर्थ जाणणे. असे शब्द विशिष्ट नियमांनी एकत्र आलेले असतात. ते पण क्रमाने पाहणे, ओळखणे आणि त्यांचा एकत्रितपणे अर्थ जाणणे म्हणजेच वाक्याचा अर्थ जाणणे होय, वाक्यांचा परिच्छेद होत असतो. त्याचाही एकत्रित अर्थ जाणला जातो.

वाचनकौशल्य शिकवताना शिक्षकाला वाचन–कौशल्याची खालील महत्त्वाची वैशिष्ट्ये लक्षात घेणे आवश्यक आहे :

(१) वाचनकौशल्य हे ग्रहणशील (Receptive) कौशल्य आहे. (२) वाचन हे अर्थपूर्ण असावे लागते. (३) वाचन ही डोळ्यांमार्फत घडून येणारी इंद्रिय संवेदनाची (Sensory Perception) प्रक्रिया आहे. (४) वाचनातून ज्ञानप्राप्ती होते. (५) चांगले वाचनकौशल्य लेखन कौशल्यासाठी प्रेरणा देऊ शकते. (६) वाचन कौशल्यातून स्मरणशक्तीचा चांगला विकास होतो. (७) वाचन कौशल्यामध्ये दृष्टी संवेदन, शब्द व अर्थ साहचर्य, संकल्पना विकसन, अर्थनिर्वचन आणि स्मरण या प्रक्रिया अंतर्भूत असतात. (८) वाचन ही हेतूपूर्वक घडणारी प्रक्रिया आहे. (९) वाचन ही पुनर्निर्मितीच्या अंगाने जाणारी प्रक्रिया आहे. आपण वाचतो म्हणजे नवा अनुभव घेत असतो व आपल्या पूर्वानुभवांशी नवा अनुभव पडताळून पाहात असतो. (१०) वाचनकौशल्यात अनेक उपकौशल्ये समाविष्ट असतात. वाचनाचे प्रक्रियेनुसार दोन प्रकार पडतात. प्रकटवाचन व मूकवाचन.

प्रकटवाचन म्हणजे लेखकाने लिहिलेले विचार, कल्पना, भावना योग्य त्या विरामचिन्हांसह योग्य ठिकाणी आघात देत, स्वरांच्या चढ–उतारासंह शुद्ध उच्चार करत श्रोत्यांपर्यंत पोहोचविणे, तर मूकवाचन म्हणजे वाचकाने मनातल्या मनात अर्थ ग्रहणासाठी, आकलनासाठी, आनंदासाठी केलेले वाचन होय.

चांगले वाचनकौशल्य आत्मसात असणाऱ्या व्यक्तींमध्ये खालील क्षमता आढळून येतात. या क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे हे भाषा शिक्षकाचे ध्येय असले पाहिजे.

(१) सर्वसाधारण गतीमध्ये वाचन करता येणे. (२) परिच्छेदातील मुख्य वाक्य ओळखता येणे. (३) शब्द, वाक्प्रचार आणि वाक्ये यांचे योग्य अर्थ समजणे. (४) अपरिचित शब्दाचा अर्थ संदर्भावरून अंदाजाने ओळखणे. (५) विरामचिन्हांचा अर्थ समजणे व त्यानुसार वाचन करणे.

वाचनकौशल्याच्या अध्ययन–अध्यापनाची विविध तंत्रे आणि पद्धती आहेत. वाचनाचे कौशल्य हे अगदी बालपणापासून शिकवावे लागते; म्हणजेच प्राथमिक शिक्षणाच्या टप्प्यापासून त्याची सुरुवात करावी लागते. या टप्प्यामध्ये 'पाहा आणि ओळखा' (Look and Recognize) किंवा 'पाहा आणि म्हणा' (Look and Say) ही तंत्रे वापरली जातात. अर्थातच ही सुरुवात अक्षरांपासूनच करावी लागते. सुटी अक्षरे पाहून ओळखणे किंवा सांगणे हा प्रवास पुढे क्रमाक्रमाने शब्द, वाक्ये व परिच्छेद असा होत राहतो. बाल वाचकांसाठी अक्षरांचा आकार स्पष्ट व मोठा असावा लागतो आणि महत्त्वाचे म्हणजे त्या सोबत शेजारी किंवा आजूबाजूला छान रंगीत चित्रे द्यायची असतात. अशा चित्रांमुळे शब्द आणि त्यांचा अर्थ यांची सांगड अथवा साहचर्य योग्य रीतीने जोडता येते. या चित्रांमुळेच तर मुलांना वाचनाची गोडी लागते.

अगदी सुरुवातीच्या काळात मुलांना वाचन करत असताना त्या अक्षरांवरून, शब्दांवरून अथवा वाक्यांवरून बोट फिरवणे आवश्यक वाटते आणि ते

साहजिकही आहे. मात्र पुढे पुढे ही सवय कमी होत जाऊन बोट न फिरवता वाचता येणे आवश्यक आहे.

वाचनकौशल्य विकसित करत असताना खालील गोष्टी लक्षात घ्यायला हव्यात–

(१) वाचन सरावाचा वेळ हळूहळू वाढवत न्यावा लागतो.

(२) वाचनाची गती वाढवण्यासाठी नजरेच्या एका टप्प्यात बसणाऱ्या शब्दांची संख्या वाढत गेली पाहिजे. त्याला इंग्रजीत eyeful किंवा visual bite असे म्हणतात. तो जणू 'नजरेचा घास' असतो.

(३) वाक्यांवरून बोट फिरविणे किंवा मूकवाचन करताना ओठांची पुटपुट किंवा हालचाल करणे या सवयी टाळल्या पाहिजेत.

(४) वाचन नेहमी पुढे पुढेच होत राहिले पाहिजे. काहींना परत मागे वळून दोन-चार शब्द पुन्हा वाचत जाण्याची सवय असते. अशा सवयीमुळे वाचनाचा वेग मंदावतो.

(५) विरामचिन्हांकडे दुर्लक्ष करता कामा नये. ती गृहीत धरून वाचनाचे नियमन करता आले पाहिजे.

(६) वाचन चांगले होण्यासाठी योग्य बैठक व्यवस्था, पुरेसा प्रकाश, शांत वातावरण व प्रसन्न मनःस्थिती आवश्यक असते.

योग्य व अर्थपूर्ण वाचन करण्यासाठी दिशादर्शक शब्द म्हणजेच Signal words ही संकल्पना लक्षात घ्यावी लागते. ज्याप्रमाणे हायवे वर वाहतुकीच्या मार्गदर्शनसाठी विशिष्ट खुणांचे बोर्ड असतात, तसे हे दिशादर्शक शब्द आपल्या वाचनाच्या वाहतुकीचे किंवा प्रवासाचे नियमन करतात.

उदाहरणार्थ, काही शब्द पुढे जा (Go Ahead) असे दर्शविणारे असतात. जसे, वाक्यामध्ये जर 'आणि', 'तसेच', 'त्यापेक्षा, आणखी एक म्हणजे', 'सुद्धा', 'देखील', 'त्याचप्रमाणे', 'त्याशिवाय', 'त्याखेरीज' हे शब्द आले तर ते आपल्याला अर्थाच्या दृष्टीने पुढे जायला किंवा चालू ठेवायला सांगतात.

पुढील शब्द जर वाक्यात आले, तर ते आपल्याला वळायला किंवा दिशा बदलायला सांगतात असे लक्षात येईल. जसे, 'पण', 'परंतु', 'किंवा', 'जरी', 'असे असून सुद्धा', 'तर उलट' इत्यादी.

काही शब्द आपल्याला चक्क वाचनाची गती कमी करण्याचा संकेत देतात. उदा., 'कारण की', 'उदाहरणार्थ', 'तसे पाहिले तर' इत्यादी.

अर्थपूर्ण वाचनकौशल्य विकसित करण्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी खालील उपक्रम करून घ्यावेत–

(१) मोठ्या अक्षरात लिहिलेली शब्दकार्डे दाखवून विद्यार्थ्यांना ती मोठ्याने म्हणायला सांगणे किंवा शक्य तेव्हा त्यानुसार कृती करायला लावणे.

(२) नित्याच्या परिचयातील शब्द वाचून घेणे. जसे वारांची, महिन्यांची नावे.

(३) शब्द वाचून संबंधित चित्राजवळ ठेवणे.

(४) शिक्षकांनी प्रकटवाचन करणे व त्यावेळी विद्यार्थ्यांनी त्याच मजकुराचे पुस्तकात पाहात मूकवाचन करणे.

(५) विद्यार्थ्यांकडून पात्र योजना करून नाट्यवाचन घडवून आणणे.

शेवटी, समारोपात असे म्हणावेसे वाटते, की आजच्या ज्ञानाधिष्ठित आणि वेगवान जगात वाचन मजकुराचा स्फोट झाला आहे. कोट्यवधी पाने भरतील किंवा लाखो पुस्तके छापता येतील, एवढ्या प्रचंड प्रमाणात वाचनासाठीचा मजकूर उपलब्ध आहे. कमी वेळात जास्त वाचणे, वाचल्यावर लगेच आकलन होणे आणि जे आकलन झाले त्याची दैनंदिन जीवनातील उपयोगिता लक्षात घेणे ही काळाची गरज आहे.

जीवन शिक्षण शतकोत्तर हीरक महोत्सव

## इतिहासाच्या पानांवरून

श्रीकांत चौगुले
भ्रमणध्वनी : ७५०७७७९३९३

# शाळा सोडल्याचा दाखला (लिव्हिंग सर्टिफिकेट)

शैक्षणिक वाटचाल करत असताना आणि नंतरच्या काळातही लिव्हिंग सर्टिफिकेटला खूप महत्त्व असते. पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेताना त्याचा उपयोग होतो. जन्मतारीख, जात यांच्यासाठी ते महत्त्वाचे ठरते. साधारण शंभर–दीडशे वर्षांपूर्वी परिस्थिती वेगळी होती. शाळेत प्रवेश घेताना बहुतेकांना जन्मतारीख माहीत नसायची. शिक्षक अंदाजे वय ठरवत. त्याप्रमाणे नोंद करत. प्राथमिक शाळेत एका शाळेतून दुसऱ्या शाळेत प्रवेश घ्यायचा असेल, तर त्या विद्यार्थ्यांची तयारी बघून, त्याप्रमाणे वर्गात प्रवेश दिला जाई. पुढे इंग्रजी शाळेत म्हणजेच हायस्कूलला जायचे असेल, तर कितवी पास झाला याबाबतचे मुख्याध्यापकांचे लेखी पत्र द्यावे लागत असे. पुढील काळात त्यामध्ये नेमकी काय माहिती हवी, याचा विचार करून, तसा आदेश काढण्यात आला.

पुणे विभागाचे तत्कालीन एज्युकेशन इन्स्पेक्टर जे. जी. कव्हर्टन यांनी ३१ ऑगस्ट, १९०० रोजी शाळांना त्याबाबतचे पत्र पाठवले आहे. त्यानंतर मार्च १९०१ मध्ये शालापत्रकाच्या अंकात त्याबाबतची नोटीस प्रसिद्ध केली आहे. त्यामध्ये लिव्हिंग सर्टिफिकेट कसे असावे, त्यामध्ये कोणकोणती माहिती असावी हे सांगितले आहे. मुलाचे नाव, जन्मतारीख, शाळेत दाखल केल्याची तारीख, पूर्वीच्या शाळेचे नाव, मुलाचे वर्तन व अभ्यास, तसेच फी भरली की नाही असे मुद्दे देण्यात आले आहेत. या नोटीसवरून लिव्हिंग सर्टिफिकेट छापली गेली व आजपर्यंत साधारण तशीच पद्धत आहे. फक्त गरजेनुसार त्यामध्ये बदल झाले. सुरुवातीला धर्म आणि जात यांचा उल्लेख नव्हता. तो नंतरच्या काळात केला गेला. तसेच स्वातंत्र्यपूर्वकाळात सर्व प्रकारच्या शाळांना फी होती. नंतर मोफत व सक्तीचे शिक्षण झाल्याने लिव्हिंग सर्टिफिकेटवरील फी चा रकाना वगळला गेला. पुढच्या टप्प्यात २००० मध्ये दाखल्यामध्ये आईच्या नावाची नोंद घेण्यात आली, तर २०१६ पासून आधारकार्ड नंबर, शाळेचा युडायस नंबर, पत्ता, ई–मेल, इत्यादी माहितीचा समावेश केला गेला. अशाप्रकारे लिव्हिंग सर्टिफिकेटची सुरुवात आणि वाटचाल झालेली दिसते.



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथे मराठी भाषा विभागातर्फे स्पर्धा परीक्षा प्रश्नसंच विकसन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना मा. डॉ. कमलादेवी आवटे, उपसंचालक (भाषा), डॉ. राजेश बनकर, विभाग प्रमुख (भाषा), परिषदेतील अन्य अधिकारी व राज्यभरातील मराठी भाषा तज्ज्ञ उपस्थित होते.







संशोधन विभागाच्या वतीने आयोजित 'संशोधन आढावा आणि पुढील नियोजन' या विषयावरती राज्यभरातील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांमधील अधिकारी यांची कार्यशाळा दिनांक २७ जुलै रोजी आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी परिषदेचे मा. उपसंचालक, डॉ. कमलादेवी आवटे, डॉ. नेहा बेलसरे, डॉ. माधुरी सावरकर, रत्नप्रभा भालेराव तसेच संशोधन विभाग प्रमुख डॉ. दत्तात्रय थिटे यांचेसह परिषदेतील सर्व विभाग प्रमुख अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

Date of Publication : 1 August, 2023
Jeevan Shikshan Magazine is posted
on 3rd and 4th August, 2023
at GPO, PSO, Pune - 411 001.

**'Registered'**

RNI No. 14563/1957
Post Registration No.: PCW/063/2021-2023
Licensed to post without prepayment postage No.: **WPP - 28**

२९ ऑगस्ट

# राष्ट्रीय क्रीडा दिन

**दृढ संकल्प करूया....**
**क्रीडा संस्कृती रुजवूया!**

## राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!



पत्रव्यवहाराचा पत्ता :
**संपादक, जीवन शिक्षण**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
दूरध्वनी : ०२०-२४४८८३८२
फॅक्स नं.: ०२०-२४४७७०९०.
**ई मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

**प्रति** ______________________